नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १८६ | किंमत : ४ रूपये

Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे    POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




शनिवार, दि. १३ जून २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## थोडक्यात...

### वारकऱ्यांसाठी सर्वोत्तम सुविधा उपलब्ध करा

पुणे (स. गांवकरी) : आगामी आषाढी पालखी सोहळ्याचे नियोजन सर्वोत्तम करा, वारकऱ्यांना उत्तम सुविधा, त्यांची सुरक्षा याकडे लक्ष द्या. सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे, असे आदेश उपमुख्यमंत्री तथा पुण्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार यांनी दिले. पुणे विभागीय आयुक्त कार्यालयातील झुंबर हॉल येथे आयोजित पालखी सोहळा नियोजन बैठकीत त्या बोलत होत्या. बैठकीला पुणे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष विरधवल जगदाळे, पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे, पिंपरी-चिंचवडचे महापौर रवी लांडगे, विभागीय आयुक्त शीतल तेली-उगले, पालखी सोहळ्यांचे विश्वस्त आणि दिंडी प्रमुख, अधिकारी उपस्थित होते. सुनेत्रा पवार म्हणाल्या, आषाढी वारी ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरेचा मानबिंदू आहे. लाखो वारकऱ्यांच्या सोयीसाठी पालखी मार्गावरील रस्ते, मुक्कामस्थळे आणि विसावास्थळांवरील सर्व कामे वेळेत पूर्ण करावीत.

### कामे तातडीने पूर्ण करण्याचे आदेश

बालेवाडी (स. गांवकरी) : पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर बाणेर रोड ते विद्यापीठ चौक परिसरातील वाहतूक आणि पाणी निचऱ्याच्या समस्यांवर तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश पुणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त (विशेष) ओमप्रकाश दिवटे यांनी संबंधित विभागांना दिले. हॉटेल ग्रीन पार्क ते विद्यापीठ चौक या मार्गावरील रस्ते, मेट्रो प्रकल्पाची कामे आणि वाहतुकीच्या अडचणींची त्यांनी शुक्रवारी संयुक्त पाहणी केली. गेल्या पावसाळ्यात विद्यापीठ चौक तसेच महाबळेश्वर हॉटेल परिसरात पाणी साचल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागला होता. ही समस्या टाळण्यासाठी विद्यापीठ चौकापासून संपूर्ण मार्गावरील पावसाच्या पाण्याचा निचरा सुरळीत होण्यासाठी पीएमआरडीए आणि मेट्रो प्रशासनाने चार दिवसांत आवश्यक उपाययोजना कराव्यात, असे निर्देश देण्यात आले. सिंध सोसायटी आणि नॅशनल सोसायटीसमोरील मेट्रोच्या कामालगत पडून असलेल्या राडारोड्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले. तसेच ग्रीन पार्क ते विद्यापीठ चौकदरम्यान मेट्रोच्या कामांमुळे निर्माण झालेल्या विविध समस्यांवरही चर्चा करण्यात आली. डिव्हायडरची विस्कळीत रचना, रस्त्याची असमतोल पातळी, मेट्रो स्थानकांखालील नादुरुस्त पदपथ, कमी झालेली रस्त्याची रुंदी आणि आयसर संस्थेसमोरील बंद पावसाळी वाहिनी यांसारख्या बाबी तातडीने दुरुस्त करण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.

# नाट्यमय घडामोडीनंतर रोहित पवारांचे पंढरपुरात अन्नत्याग आंदोलन

## सरसकट कर्जमाफी जाहीर होईपर्यंत करणार आंदोलन

पंढरपूर : (स. गांवकरी)

शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी राष्ट्रवादीचे आमदार रोहित पवार यांनी 'अन्नदात्यासाठी अन्नत्याग' आंदोलन पंढरपुरात सुरू केले. सरकारने जाचक अटी रद्द करून सरसकट कर्जमाफी जाहीर करावी. जोपर्यंत सरकार जाहीर करत नाही, तोपर्यंत आंदोलन सुरू राहील, असा इशारा आमदार रोहित पवार यांनी दिला.

राष्ट्रवादीचे आमदार रोहित पवार हे सरकारच्या कर्जमाफी आणि विविध प्रश्नांवर रस्त्यावर उतरले आहेत. 'अन्नादात्यासाठी अन्नत्याग' आंदोलनाला पंढरपुरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे शुक्रवारी सुरुवात केली. सध्या विधान परिषदेची आचार संहिता आहे. या पार्श्वभूमीवर आमदार रोहित पवारांनी विचार करावा, असे पत्र जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांना दिले होते. पण त्या पत्राकडे दुर्लक्ष करीत आंदोलन नियोजित स्थळीच सुरू करण्यात आले. ज्या ठिकाणी आंदोलन करणार आहेत, तिथे कायदा व सुव्यवस्था, वाहतूक व्यवस्थेचे कारण देत शुक्रवारी सकाळी पोलीस प्रशासनाने आमदार पवार यांना नोटीस बजावली आहे. मात्र, पवार आंदोलनावर ठाम राहिले.



या आंदोलनाला सुरुवात करण्याआधी संत नामदेव पायरी येथे जाऊन दर्शन घेतले. त्या ठिकाणी आरती केली. फडणवीस सरकारला सरसकट कर्ज माफी करण्याची बुद्धी दे, असे साकडे आमदार रोहित पवार यांनी घातले. त्या नंतर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला अभिवादन करून आंदोलनाच्या ठिकाणी हातात संविधान घेवून आमदार रोहित पवार दाखल झाले. या वेळी जिल्ह्यातील राष्ट्रवादी कॉंग्रेस ( श.प. ) पक्षाचे आमदार राजू खरे, भाजपाच्या बैठकीला हजर राहिलेले, राष्ट्रवादीचे आमदार अभिजित पाटील यांच्यासह पदाधिकारी आणि काही शेतकरी उपस्थित होते.

गेल्या आठ महिन्यांपूर्वी सरकारने कर्जमाफीचे सर्व निकष बँकांकडून यादी मागवत जाहीर केलेले होते. याची सगळी माहिती विधानसभेमध्ये चर्चेच्या वेळेस मिळाली होती. त्यावेळेस रोहित पवारांनी त्या निकषाला हरकत घेणे गरजेचे होते. त्या ठिकाणी त्यांनी बोटचेपे धोरण घेतले आणि हे आंदोलन पंढरपूर येथे घेतले. सध्या अधिक महिन्यामुळे भाविकांची प्रचंड गर्दी आहे. या गर्दीला वेठीस धरून प्रशासनावर ताण यावा म्हणून ही स्टंटबाजी करण्याचे काम रोहित पवार करत आहेत.

> जर रोहित पवार यांना शेतकऱ्यांचा इतका कळवळा असेल, तर हे आंदोलन त्यांनी शेत शिवारामध्ये घ्यायला हवे होते, म्हणजे खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांच्या प्रश्नाला न्याय मिळाला असता. आता त्यांनी मात्र आपल्या आंदोलनावर ठाम राहून सरसकट कर्जमाफी मिळेपर्यंत उपोषण मागे घेऊ नये. कुठल्याही आश्वासनावर त्यांनी उपोषण मागे घेऊ नये, अशी खोचक टीका भाजप किसान मोर्चाचे सचिव माउली हळणवर यांनी केली.

# लोटे औद्योगिक वसाहतीतील नंदादीप केमिकल्स कंपनीत स्फोट

## सुदैवाने जीवितहानी टळली




दापोली : (स. गांवकरी)

खेड तालुक्यातील लोटे औद्योगिक वसाहतीतील प्लॉट क्रमांक बी- ४४ मधील युनिट क्रमांक २ मध्ये असलेल्या नंदादीप केमिकल्स कंपनीत शुक्रवार १२ रोजी दुपारी सुमारे १२ वाजण्याच्या सुमारास गॅस लिकेजसह स्फोटाची घटना घडली. स्फोटाची तीव्रता इतकी मोठी होती की, कंपनीतील रिऍक्टरचे झाकण उडून बाहेर पडले. तर छतावरील पत्रे आणि कॉंक्रीटचे तुकडे कंपनीच्या कंपाऊंड च्या बाहेर जाऊन पडलेले होते. या घटनेत एका वाहनांचे नुकसान झाले असून सुदैवाने कोणतीही जीवितहानी किंवा गंभीर दुखापत झालेली नाही. मिळालेल्या माहितीनुसार, नंदादीप केमिकल्स कंपनीच्या युनिट क्रमांक २ मध्ये उत्पादन प्रक्रिया सुरू असताना अचानक रिऍक्टरमधील दाब वाढल्याने गॅस लिकेज होऊन स्फोट झाला. या स्फोटामुळे रिऍक्टरचे झाकण उडून बाहेर पडले तसेच रिऍक्टरमधील पावडर रस्त्यावर विखुरली. स्फोटाचा मोठा आवाज परिसरात दूरवर ऐकू गेल्याने नागरिकांमध्ये काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. घटनेची माहिती मिळताच लोटे एमआयडीसी अग्निशमन दलाचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी परिस्थिती नियंत्रणात आणत गॅस लिकेज आटोक्यात आणले. दुर्घटनेमुळे कंपनीच्या बाहेर रस्त्यावर उभ्या असलेल्या चारचाकी वाहनांचे नुकसान झाल्याचेही समोर आले आहे. या घटनेची माहिती मिळताच खेड पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विवेक अहिरे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.

# कर्जमुक्ती योजनेच्या अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकाऱ्यांची समिती

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. ही समिती योजनेसाठी अपात्र ठरलेल्या व्यक्तींची यादीही पोर्टलवर अपलोड करणार आहे. या समितीमध्ये जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा बँक जिल्हा बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक, व्यापारी बँकेचे जिल्हा समन्वयक हे सदस्य तर सहकार विभागाचे जिल्हा उपनिबंधक सदस्य सचिव असणार आहेत. योजनेच्या अंमलबजावणीची जबाबदारी या समितीवर असणार आहे. यासंदर्भातील आदेश सहकार विभागाकडून जारी करण्यात आला आहे. कर्जमुक्ती योजनेत लाभास अपात्र असलेल्यांमध्ये महापालिका, नगरपालिका, नगरपंचायत, जिल्हा परिषद, पंचायत समितीचे पदाधिकारी, सदस्य, अधिकारी, कर्मचाऱ्यांची माहिती पोर्टलवर अपलोड करण्याच्या प्रक्रियेचे सनियंत्रण ही समिती करणार आहे. आधार लिंक नसलेल्या कर्जखात्यांची यादी प्रसिद्ध करणे, योजनेस पात्र असलेल्या शेतकऱ्यांची यादी प्रसिद्ध करणे, ॲग्रीस्टॅग नोंदणी करण्यासाठी व आधार प्रमाणीकरणासाठी मेळावे घेण्याच्या सूचना समितीला करण्यात आल्या आहेत. कर्जमुक्ती योजनेअंतर्गत १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत घेतलेल्या अल्पमुदत पीक कर्जाची ३० सप्टेंबर २०२५ रोजी थकबाकी असलेली व ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेले कर्ज वितरण विचारात घेण्यात येणार आहेत. पात्र शेतकऱ्यांना प्रति शेतकरी कमाल २ लाखांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ देण्यात येणार आहे तसेच यापूर्वी महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०१९ चा लाभ घेतलेल्या पात्र शेतकऱ्यांना कमाल ५० हजारांपर्यंत कर्जमुक्ती देण्यात येईल. ज्या शेतकऱ्यांची थकबाकी निर्धारित मर्यादेपेक्षा जास्त आहे अशा शेतकऱ्यांना एकवेळ समझोता (ओटीएस) योजनेअंतर्गत अतिरिक्त रक्कम भरल्यानंतर शासनाचा लाभ मिळू शकणार आहे. यासाठी पात्र शेतकऱ्यांना ३१ मार्च २०२७ पर्यंत मुदत देण्यात आली आहे.



अपात्र लाभार्थ्यांची यादीही प्रसिद्ध होणार

# भारतीय जहाजांवरील ड्रोन हल्ले अस्वीकार्य : डोनाल्ड ट्रम्प

## भारतीय जहाजांवरील हल्ल्यांसाठी इराणला धरलं जबाबदार



मुंबई : (स. गांवकरी)

अमेरिका आणि इराणमधील युद्धाबाबत तीन महिन्यानंतर देखील ठोस तोडगा निघालेला नाही. या युद्धाचा परिणाम होर्मुझ सामुद्रधुनीतून जाणाऱ्या आणि येणाऱ्या जहाजांवर होत असून याचा फटका अनेक देशांच्या जागतिक व्यापाराला बसत आहे. इराणवर भीषण हल्ला करण्याची धमकी देणाऱ्या डोनाल्ड ट्रम्प यांनी गुरुवारी काही तासांतच यू-टर्न घेतला. इराणबरोबर शांतता करारासंबधित सकारात्मक चर्चा झाल्याचा दावा करत इराणवरील नियोजित हवाई हल्ले रद्द केल्याची घोषणा त्यांनी गुरुवारी रात्री केली.

अमेरिका आणि इराणमधील या घडामोडी दरम्यान गेल्या चार दिवसांत अमेरिकेच्या लष्कराने ओमान किनारपट्टीजवळ अनेक जहाजांवर हल्ले केले. या हल्ल्यात आतापर्यंत तीन भारतीय खलाशांचा मृत्यू झाला आहे. या घटनेचा भारत सरकारने निषेध करत अमेरिकेच्या उप-राजदूतांना समन्स बजावले होते. तसेच अमेरिकेच्या यूएस सेंट्रल कमांडने भारतीय जहाजांवरील हल्ल्याची कबुली देखील दिली होती. मात्र, असं असतानाही आता डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतीय जहाजांवरील हल्ल्यांसाठी इराणला जबाबदार धरलं आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी ट्रुथ सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टच्या माध्यमातून डोनाल्ड ट्रम्प हे इराणवर चांगलेच भडकले आहेत. भारतीय जहाजांवरील ड्रोन हल्ले अस्वीकार्य असल्याचं म्हणत डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतीय जहाजांवरील हल्ल्यांसाठी इराण जबाबदार असल्याचा दावा केला आहे.

"फेक न्यूज (खोट्या बातम्या) संदर्भात इराणने ज्या गोष्टींचा उल्लेख केला, त्याचा लेखी स्वरूपात मान्य करण्यात आलेल्या अटींशी काहीही संबंध नाही. त्यांनी केलेलं विधान ज्यात कराराबाबतच्या त्यांच्या कमकुवत आणि दयनीय विधानाचाही समावेश आहे. त्याचा वास्तवाशी काहीही संबंध नाही. त्यांच्याशी व्यवहार करणं ही पूर्णपणे अप्रामाणिक बाब आहे. त्यांच्याशी प्रामाणिकपणे व्यवहार करणं अशक्य आहे. हे अविश्वसनीय आहे", असं डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे.

"शिवाय, काल रात्री 'स्ट्रेट ऑफ होर्मुझ'मधून जाणाऱ्या भारतीय जहाजांवर त्यांनी केलेला ड्रोन हल्ला पूर्णपणे हाणून पाडण्यात आला. अशा कारवाया अजिबात स्वीकारार्ह नाहीत. त्यांनी (इराणने) आपली वागणूक त्वरित सुधारली पाहिजे", असं डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे.

अमेरिकेच्या लष्कराने ओमान किनारपट्टीजवळ गेल्या चार दिवसांत अनेक जहाजांवर हल्ला केला. या हल्ल्यात आतापर्यंत तीन भारतीय खलाशांचा मृत्यू झाला. या हल्ल्याच्या घटनेला अमेरिकेच्या सैन्याने दुजोरा देखील दिला होता. ओमानच्या आखाताजवळ मागच्या चार दिवसांत भारतीय खलाशी असलेल्या जहाजांवर झालेल्या तिसऱ्या हल्ल्यात अमेरिकी सैन्याने गुरुवारी 'एमटी जलवीर' या जहाजावर दोन 'हेलफायर' क्षेपणास्त्रे डागल्याची कबुली यूएस सेंट्रल कमांडने दिली होती. तसेच 'एमटी जलवीर'वरील हल्ल्याचा व्हिडीओ देखील जारी केला होता.

अमेरिकेच्या सेंट्रल कमांडच्या म्हणण्यानुसार, ही कारवाई 'सर्व देशांच्या जहाजांविरुद्ध समानतेने लागू करण्यात आलेल्या नाकेबंदीचा एक भाग होती. तसेच अमेरिकेच्या सेंट्रल कमांडने हे मान्य केलं की, त्यांनी जहाजाच्या इंजिन रूमवर दोन हेलफायर क्षेपणास्त्रे डागली होती.

## युद्धबंदीबाबत डोनाल्ड ट्रम्प लवकरच मोठी घोषणा करणार

> गेल्या काही दिवसांपासून अमेरिका आणि इराणमधील वाढत्या तणावामुळे जागतिक पातळीवर युद्धाचे ढग जमा झाले होते. मात्र, डोनाल्ड ट्रम्प यांनी अचानक एक मोठा निर्णय घेत इराणवरील संभाव्य हवाई आणि क्षेपणास्त्र हल्ले मागे घेतले आहेत. इराणसोबत एका 'ऐतिहासिक करारावर' स्वाक्षरी होणार असून, त्यानंतर आंतरराष्ट्रीय पातळीवर अत्यंत महत्त्वाची मानली जाणारी 'हार्मुझची सामुद्रधुनी' व्यापारासाठी पूर्णपणे खुली केली जाईल, अशी घोषणा ट्रम्प यांनी केली आहे. या आठवड्याअखेर किंवा सोमवारी युरोपमध्ये या करारावर स्वाक्षरी होण्याची शक्यता असल्याचे संकेत डोनाल्ड ट्रम्प यांनी दिले आहेत.

# एसटीतून प्रवासासाठी स्मार्ट कार्ड बंधनकारक

मुंबई : (स. गांवकरी)

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या प्रवासी सेवांमध्ये अधिक पारदर्शकता, सुलभता आणि डिजिटल व्यवहारांना चालना देण्यासाठी महिला, ज्येष्ठ नागरिक आणि अमृत ज्येष्ठ नागरिक प्रवाशांसाठी एनसीएमसी (नॅशनल कॉमन मोबिलीटी कार्ड) स्मार्ट कार्ड बंधनकारक करण्यात येणार आहे, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर राज्यभर एनसीएमसी स्मार्ट कार्ड नोंदणी आणि वितरण मोहिमेला वेग आला असून आज अखेर राज्यातील सुमारे ५१ लाख नागरिकांनी एनसीएमसी स्मार्ट कार्डसाठी नोंदणी केली आहे. त्यापैकी सुमारे २५ लाख स्मार्ट कार्ड कार्यान्वित करण्यात आले आहेत. उर्वरित नोंदणीकृत लाभार्थ्यांची कार्ड्स लवकरच सुरू करण्यात येत असल्याने लाभार्थ्यांनी विलंब न करता आपली प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी आणि कार्ड वितरण प्रक्रिया अधिक सुलभ करण्यासाठी राज्यभरात ४ हजारांहून अधिक स्मार्ट कार्ड वितरण केंद्रे कार्यरत आहेत. ग्रामीण आणि शहरी भागातील नागरिकांना सहजपणे कार्ड उपलब्ध व्हावे यासाठी ही केंद्रे सक्रियपणे सेवा देत आहेत.




दरम्यान, स्मार्ट कार्डच्या वितरणामध्ये कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार खपवून घेतला जाणार नसल्याचे मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले आहे. विहित शुल्कापेक्षा अधिक रक्कम आकारून स्मार्ट कार्डची विक्री करणाऱ्या वितरण केंद्रांवर कठोर कारवाई करण्यात येणार असून अशा केंद्रांचा वितरण परवाना तत्काळ रद्द करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले आहे. महिला, ज्येष्ठ नागरिक आणि अमृत ज्येष्ठ नागरिकांना शासनाच्या विविध प्रवासी सवलतींचा लाभ सुरळीतपणे मिळावा, तिकीट वितरण प्रक्रियेत पारदर्शकता यावी आणि प्रवास व्यवस्थापन अधिक आधुनिक व्हावे, या उद्देशाने स्मार्ट कार्ड प्रणाली राबविण्यात येत आहे. त्यामुळे संबंधित लाभार्थ्यांनी १ ऑगस्टपूर्वी आपले स्मार्ट कार्ड प्राप्त करून ते कार्यान्वित करून घ्यावे.1 ऑगस्ट नंतर या निर्णयाची अंमलबजावणी होईल असे सरनाईक यांनी सांगितले.



## थोडक्यात पण महत्वाचे



### विद्यार्थी आघाडी नाशिक जिल्हा अध्यक्षपदी दत्ता आरोटे यांची निवड!

तामसवाडी (स. गांवकरी) : भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा विद्यार्थी आघाडीच्या नाशिक जिल्हाध्यक्षपदी तामसवाडी (ता. निफाड) येथील युवा नेतृत्व दत्ता आरोटे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीमुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध स्तरांतून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. नियुक्तीपत्र प्रदान समारंभात भाजपचे उत्तर महाराष्ट्र संयोजक विजय चौधरी, युवा मोर्चा नाशिक जिल्हाप्रमुख समीर समदडिया, नाशिक उत्तर ग्रामीण जिल्हाप्रमुख यतीन कदम, निफाड विधानसभा प्रमुख वैकुंठ पाटील, येवला विधानसभा प्रमुख अमृता पवार, पिंपळगाव बसवंत उपनगराध्यक्ष सतीश मोरे, जिल्हा सरचिटणीस बापू पाटील, संजय गाजरे, अरबाज पठाण, किरण पवार, सारिका डेर्ले, आदेश सानप, संदीप नागरे आदी मान्यवर उपस्थित होते. दत्ता आरोटे यांनी यापूर्वी प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते बच्चू कडू यांच्या प्रहार विद्यार्थी आघाडीमध्ये जिल्हास्तरावरील जबाबदारी यशस्वीपणे सांभाळली आहे. तसेच ते तामसवाडी ग्रामपंचायतीचे उपसरपंच म्हणूनही कार्यरत राहिले आहेत. सामाजिक, शैक्षणिक व युवकांच्या विविध प्रश्नांवर त्यांनी सातत्याने काम केले असून त्यांच्या नेतृत्वगुणांची दखल घेत भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा विद्यार्थी आघाडीच्या नाशिक जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे. यावेळी उपस्थित मान्यवरांनी दत्ता आरोटे यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देत युवकांना संघटित करून पक्षाची विचारधारा तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी कार्य करण्याचे आवाहन केले. आपल्या निवडीबद्दल दत्ता आरोटे यांनी पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाचे आभार मानत विद्यार्थ्यांचे व युवकांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रामाणिकपणे काम करण्याचा निर्धार व्यक्त केला.

### अवैधरित्या ताडी विक्री करणे युवकाला पडले महागात

जुन्नर तालुका (स. गांवकरी) : महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९ चे कलम ६५ (ई) प्रमाणे बेकायदेशीर ताडी विक्री करताना रविंद्र दशरथ भंडारी, वय ४० वर्ष रा:-उदापुर ता:- जुन्नर जि:-पुणे आढळुन आल्याने त्याच्या विरुध्द संपत शांताराम भालेकर, वय ३२ वर्षे, पोलीस अमंलदार ब. नं. १८०५ नेमणुक ओतुर पोलीस स्टेशन ता:-जुन्नर जि:-पुणे यांनी फिर्याद दाखल केली. याबाबत सविस्तर माहिती मिळाली की गुरुवार दिनांक १२ जून रोजी १:२५ वा. चे सुमारास मौजे मढ ता;-जुन्नर जि:-पुणे गावाचे हद्दीतील अहील्यानगर ते कल्याण बाजुकडे जाणारा रस्त्याच्या बाजुला असलेले घराच्या जवळील आंब्याच्या झाडाच्या आडोशाला रविंद्र दशरथ भंडारी वय ४० वर्ष रा:-उदापुर ता:-जुन्नर जि:-पुणे पुणे हा बेकायदा बिगरपरवाना चोरटी ताडी विक्री करण्याचे उद्देशाने आपले ताब्यातील पांढ-या रंगाच्या गोणीमध्ये मध्ये ताडीच्या एकुण ११० पिशव्या प्रत्येक पिशवीची ३० रू.किंमत प्रमाणे एकुण ३३००/-रू किमतीचे प्रोक्षीशन मालासह मिळुन आला आहे म्हणुन रविंद्र दशरथ भंडारी याचे विरुध्द मुंबई प्रोव्हिशन ॲक्ट कलम ६५(ई) प्रमाणे सरकार तर्फे कायदेशीर फिर्याद आहे.वगैरे मजकुरावरुन गुन्हा रजि. दाखल करण्यात आला आहे पुढील तपास ओतूर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस करीत आहेत.

### एलसीबीचे किरणकुमार कबाडी शिर्डी साई मंदिर सुरक्षेत!

अहिल्यानगर (स. गांवकरी) : अहिल्यानगर जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी जिल्ह्यातील पोलीस प्रशासनात महत्त्वपूर्ण फेरबदल करत 14 पोलीस ठाण्यांच्या प्रभारी अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश जारी केले आहेत. या बदल्यांमुळे जिल्हा पोलीस दलाच्या कामकाजात अधिक कार्यक्षमता आणि गतिमानता येण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. या फेरबदलांत स्थानिक गुन्हे शाखेचे (एलसीबी) पोलीस निरीक्षक किरणकुमार दशरथ कबाडी यांची शिर्डी साई मंदिर सुरक्षा विभाग येथे नियुक्ती करण्यात आली आहे. गुन्हे अन्वेषणातील त्यांच्या अनुभवाचा लाभ मंदिर सुरक्षा व्यवस्थेला होणार असल्याचे मानले जात आहे. तसेच, संजय रामभाऊ ठेंगे यांची राहुरी पोलीस ठाण्यातून श्रीगोंदा पोलीस ठाणे येथे बदली करण्यात आली आहे. त्यांच्या जागी अहिल्यानगर पोलीस नियंत्रण कक्षातील पोलीस निरीक्षक रविंद्र नरसिंह देशमुख यांची राहुरी पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकारीपदी नियुक्ती करण्यात आली आहे. याशिवाय, पोलीस निरीक्षक प्रताप पांडुरंग दराडे यांची नेवासा पोलीस ठाणे येथे नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्हा पोलीस दलातील या व्यापक फेरबदलांमुळे विविध पोलीस ठाण्यांच्या प्रशासनात नवी ऊर्जा निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्था अधिक प्रभावीपणे राखण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### मुथाळणे-मारखुलवाडी रस्त्याचा तीव्र उतार ठरतोय मृत्यूचा सापळा



अकोले (स. गांवकरी) : मुथाळणे-मारखुलवाडी मार्गावरील तीव्र उतार नागरिकांसाठी आणि वाहनचालकांसाठी मोठी डोकेदुखी ठरत असून हा उतार आता अक्षरशः मृत्यूचा सापळा बनल्याची भावना परिसरातील ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून ही समस्या कायम असतानाही संबंधित प्रशासन आणि लोकप्रतिनिधींकडून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. स्थानिक नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार, कोरोना काळात या रस्त्याचे डांबरीकरण करण्यात आले होते. मात्र, काम करणारे ठेकेदार अतुल गोरे यांनी महत्त्वाचा उतार वगळून सपाटीपासून रस्त्याचे काम केल्यामुळे ही गंभीर समस्या निर्माण झाली. परिणामी रस्त्यावर धोकादायक उतार तयार झाला असून वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. या ठिकाणी अनेक दुचाकीस्वार घसरून जखमी झाले असून सुदैवाने अद्याप कोणतीही जीवितहानी झालेली नाही. मात्र, भविष्यात मोठी दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी, ग्रामपंचायत पदाधिकारी, सरपंच, ग्रामसेवक, पंचायत समिती सदस्य, जिल्हा परिषद सदस्य तसेच आजी-माजी लोकप्रतिनिधींनी या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन रस्त्याची तातडीने दुरुस्ती करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. वेळेत उपाययोजना न केल्यास एखादा निष्पाप नागरिक जीव गमावण्याची शक्यता असल्याचा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे.

# वीज चोरी प्रकरणावरून महावितरण कर्मचाऱ्यांवर हल्ला

## गुन्हा दाखल करण्यास विलंब झाल्याने कर्मचाऱ्यांचा संताप!

अकोले : (स. गांवकरी)



अकोले तालुक्यातील अंभोळ येथे वीज चोरी शोध मोहिमेदरम्यान महावितरणच्या पथकावर हल्ला झाल्याची गंभीर घटना घडली आहे. या घटनेमुळे महावितरण कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली असून संबंधितांवर तात्काळ गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, महावितरण कंपनीचे पथक अंभोळ येथे अनधिकृत वीज वापर व वीज चोरीची तपासणी करण्यासाठी गेले होते. यावेळी वीज चोरी करत असल्याचा आरोप असलेले ग्राहक भागवत साबळे यांनी महावितरणचे अभियंता हर्षल मांडगे तसेच इतर कर्मचाऱ्यांशी वाद घालत खोऱ्याच्या दांड्याने मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला आहे. यावेळी संबंधितांनी कर्मचाऱ्यांना जीवे मारण्याची धमकीदेखील दिल्याचे सांगण्यात आले. घटनेनंतर जखमी व घाबरलेल्या कर्मचाऱ्यांनी अकोले पोलीस ठाण्यात धाव घेतली. मात्र, तब्बल तीन तासांहून अधिक काळ उलटूनही गुन्हा दाखल करण्यात टाळाटाळ होत असल्याचा आरोप कर्मचाऱ्यांनी केला आहे. त्यामुळे महावितरण कर्मचारी आक्रमक झाले असून त्यांनी पोलीस प्रशासनाविरोधात नाराजी व्यक्त केली. या घटनेची माहिती मिळताच महाराष्ट्र वीज कामगार महासंघाचे विभागीय सचिव अमोल आभाळे यांनी कार्यकारी अभियंता, संगमनेर यांच्याशी संपर्क साधून घटनेचा निषेध केला. तसेच संबंधित आरोपीवर तात्काळ कठोर कारवाई न झाल्यास बेमुदत कामबंद आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे. दरम्यान, कोतूळ व ब्राम्हणवाडा कक्षातील सर्व महावितरण कर्मचारी अकोले पोलीस ठाण्यात दाखल झाले असून आरोपीवर त्वरित गुन्हा दाखल करून अटक करण्याची मागणी त्यांनी लावून धरली आहे.

या घटनेमुळे शासकीय कर्तव्य बजावत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून पोलीस प्रशासन याप्रकरणी कोणती भूमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## ‘स्टेट ऑफ जॉय’ची भारतात दमदार एंट्री

पुणे : (स. गांवकरी)



देशातील पादत्राणांच्या बाजारपेठेत नवीन पर्वाची सुरुवात करत ‘स्टेट ऑफ जॉय’ या प्रीमियम स्नीकर ब्रँडने भारतात आपल्या उत्पादनांचे अधिकृत लाँच केले आहे. आराम, शैली आणि वैयक्तिक अभिव्यक्ती यांचा संगम घडवून आणणाऱ्या या ब्रँडकडून भारतीय ग्राहकांना नव्या प्रकारचा अनुभव देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. पादत्राणे क्षेत्रातील अनुभवी उद्योजक पुल्लेला गोपालकृष्ण बाची आणि दासरी राजू रमेश यांनी ‘स्टेट ऑफ जॉय’ची स्थापना केली आहे. दैनंदिन वापरातील पादत्राणांची व्याख्या बदलण्याच्या उद्देशाने हा ब्रँड बाजारात उतरला असून, आधुनिक जीवनशैलीला साजेशी रचनात्मक आणि आरामदायी स्नीकर्स ग्राहकांसमोर आणण्यात आली आहेत. ब्रँडच्या उत्पादनांची निर्मिती ‘ॲनाटॉमी-फर्स्ट’ अर्थात पायांच्या नैसर्गिक रचनेला प्राधान्य देणाऱ्या संकल्पनेवर आधारित आहे. त्यामुळे दिवसभर वापर करताना आराम, आधार आणि सहज हालचालींचा अनुभव मिळावा यावर विशेष भर देण्यात आला आहे. आधुनिक फॅशन आणि कार्यक्षमतेचा समतोल साधत तयार करण्यात आलेल्या या स्नीकर्समुळे ग्राहकांच्या बदलत्या अपेक्षा पूर्ण होतील, असा विश्वास कंपनीने व्यक्त केला आहे. विशेष म्हणजे ‘स्टेट ऑफ जॉय’ हा केवळ पादत्राणांचा ब्रँड नसून, तो ‘जॉय सबकल्चर’ या संकल्पनेद्वारे एक सामाजिक आणि सर्जनशील चळवळ उभी करण्याचा प्रयत्न करत आहे.

## सौ. ज्योतीताई चव्हाण यांचा सहस्त्रचंद्र दर्शन व अभिष्टचिंतन सोहळा उत्साहात संपन्न!





जुन्नर : (स. गांवकरी)

पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यातील वडज येथील सुनबाई तथा मुंबई येथील यशस्वी उद्योजिका सौ. ज्योतीताई नवनाथशेठ चव्हाण यांचा सहस्त्रचंद्र दर्शन व अभिष्टचिंतन सोहळा शुक्रवार, दि. १२ जून २०२६ रोजी सायंकाळी ५ ते ६ या वेळेत मु.पो. वडज (सुभाषवाडी), ता. जुन्नर, जि. पुणे येथे अत्यंत उत्साहपूर्ण व भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. या मंगल सोहळ्यात गं.भा. सहिंद्राबाई मारुती चव्हाण, श्री. शांताराम रामभाऊ चव्हाण, सौ. शैलाबाई शांताराम चव्हाण तसेच गं.भा. कांताबाई दत्तात्रय चव्हाण यांचा सहकुटुंब, सहपरिवार सन्मानपूर्वक औक्षण करून गौरव करण्यात आला. ढोल-ताशा पथकाच्या दणदणाटात आणि उत्साही वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमाने उपस्थितांना आनंदाची अनुभूती दिली. यानंतर सायंकाळी ६ ते ७ या वेळेत ह.भ.प. गुरुवर्य श्री ज्ञानेश्वर महाराज वाबळे यांचे संगीतमय प्रवचन संपन्न झाले. त्यांच्या प्रभावी वाणीने आणि अध्यात्मिक विचारांनी उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले. प्रवचनातून सामाजिक मूल्ये, कुटुंब व्यवस्था आणि आध्यात्मिक जीवनाचे महत्त्व यावर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ व दैनिक समर्थ गांवकरी समूहाच्या वतीने उद्योजिका सौ. ज्योतीताई चव्हाण व श्री. नवनाथ चव्हाण यांचा साईबाबांची मूर्ती, शाल, पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन विशेष सन्मान करण्यात आला. तसेच चव्हाण परिवारातील अन्य मान्यवरांचाही साईबाबांची प्रतिमा देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमास दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक तथा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे, दैनिक समर्थ गांवकरीचे मुंबई विभागीय संपादक दशरथ चव्हाण, मंगेश चव्हाण तसेच चव्हाण परिवारातील अनेक मान्यवर, नातेवाईक, मित्रपरिवार आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण सोहळा धार्मिक, सांस्कृतिक आणि कौटुंबिक ऐक्याचे दर्शन घडवणारा ठरला. उपस्थितांनी सौ. ज्योतीताई चव्हाण यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि निरंतर यशासाठी शुभेच्छा दिल्या.

# राजगुरुनगर आणि चाकण परिसरात खळबळ

- पेठ घाट परिसरात बेकायदेशीर कुंटणखाना आणि तृतीयपंथीयांच्या रॅकेटचा पर्दाफाश!

राजगुरुनगर : (स. गांवकरी)



खेड तालुक्यातील राजगुरुनगर शहरालगत असलेल्या पेठ घाट ते चाकण दरम्यानच्या परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून एक धक्कादायक आणि लज्जास्पद प्रकार सुरू असल्याचं समोर आलं आहे. या परिसरात काही महिला आणि तृतीयपंथीयांचे एक मोठे रॅकेट सक्रिय असून, रस्त्याच्या कडेलाच थेट बेकायदेशीर कुंटणखाना चालवला जात असल्याचा गंभीर आरोप स्थानिक नागरिकांकडून केला जात आहे. सामाजिक कार्यकर्ते कांतीराम बोराडे यांनी या संपूर्ण प्रकाराला वाचा फोडली असून प्रशासनाचे याकडे लक्ष वेधले आहे.

नेमकं काय घडतंय पेठ घाट परिसरात?

स्थानिक नागरिक आणि प्रवाशांनी दिलेल्या माहितीनुसार, पेठ घाट परिसरात एका कारच्या सहाय्याने हे रॅकेट चालवले जाते. या ठिकाणी अत्यंत अश्लील आणि लज्जास्पद प्रकार उघडकीस आले आहेत: रस्त्यावर उघड्यावर अश्लील कृत्ये: या परिसरात ठिकठिकाणी दारूच्या बाटल्या आणि कंडोम पडलेले पाहायला मिळत आहेत, ज्यामुळे परिसरातील वातावरण कमालीचे दूषित झाले आहे.

वाहनचालकांना भुरळ पाडण्याचे प्रकार: तृतीयपंथी आणि काही महिला नटून-थटून महामार्गाच्या कडेला थांबतात. येणाऱ्या-जाणाऱ्या गाड्यांना हात दाखवून, वाहनचालकांना जाळ्यात ओढले जाते. नागरिकांना मान खाली घालावी लागते : या रस्त्यावरून जाताना-येताना महिला, लहान मुले आणि कुटुंबियांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे. येथील घाणेरडे प्रकार पाहून मान खाली घालून प्रवास करावा लागत असल्याची संतप्त प्रतिक्रिया नागरिकांनी दिली आहे. प्रशासनाचा धाक संपला?: भररस्त्यात उघड्यावर कार लावून कुंटणखाना चालवणाऱ्या या गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांना आता प्रशासनाचा अजिबात धाक राहिलेला नाही, हेच यावरून स्पष्ट होते. कायद्याची भीती नसल्यासारखे हे लोक बिनधास्तपणे आपले रॅकेट चालवत आहेत. या भागातून प्रवास करणाऱ्या अनेक महिलांनी आणि सुजाण नागरिकांनी स्वतः फोन करून या अत्यंत बेकार आणि न पाहण्यासारख्या प्रकारांबाबत माहिती दिली आहे. "दिवसाढवळ्या आणि रात्रीच्या वेळीही हा प्रकार सुरू असतो, मग पोलीस प्रशासन कारवाईसाठी कसली वाट पाहत आहे?" असा तीव्र संताप महिलांनी व्यक्त केला आहे.

या गंभीर आणि संवेदनशील प्रकरणाला सामाजिक कार्यकर्ते कांतीराम बोराडे यांनी जाहीरपणे वाचा फोडली आहे. त्यांनी या परिसरातील परिस्थितीवर तीव्र आक्षेप घेत, हे रॅकेट तातडीने उद्ध्वस्त करण्याची मागणी केली आहे. राजगुरुनगर, पेठ घाट ते थेट चाकणपर्यंत पसरलेल्या या अनैतिक व्यवसायामुळे तालुक्याची बदनामी होत असून, तरुण पिढी बिघडत असल्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

**दररोज चालणाऱ्या या प्रकारावर प्रशासन गप्प का?**

या संपूर्ण प्रकरणात सर्वात संतापजनक बाब म्हणजे हा प्रकार लपून-छपून नव्हे, तर दररोज (डेली) उघडपणे सुरू असतो. त्यामुळे स्थानिक नागरिकांमधून आता प्रशासनाच्या भूमिकेवर गंभीर सवाल उपस्थित केले जात आहेत: प्रशासनाला हा प्रकार दिसत नाही का?: महामार्गावर इतक्या मोठ्या प्रमाणावर अनैतिक प्रकार सुरू असताना स्थानिक पोलीस आणि प्रशासकीय यंत्रणेला याची भणंग कशी नाही? की जाणूनबुजून याकडे डोळेझाक केली जात आहे? असा प्रश्न जनतेला पडला आहे.

## ग्रीनसीटी प्रकल्पासाठी सकल माळी समाज सरसावला

अहिल्यानगर : (स. गांवकरी)



ग्रीन सिटी मोहिमेचे पुरस्कर्ते उपमहापौर धनंजय जाधव यांनी नगर शहराच्या पर्यावरण चळवळीला मोठे बळ दिले आहे.कोरोना काळापासून ऑक्सिजनची कमी जाणविल्याने अनेकांना अडचणींना सामोरे जावे लागले. "झाडे लावा झाडे जगवा"या संकल्पनेतून नगर शहराच्या विकासाला मोठी चालना उपमहापौर धनंजय जाधव यांनी दिली आहे.ग्रीन सिटी या मोहिमेमुळे नगर शहराचे पर्यावरणाचे रक्षण व संवर्धन होईलच तसेच नगर शहराचे नंदनवन लवकरच होईल.या ग्रीन सिटी मोहिमेसाठी सकल माळी समाज सरसावला आहे. उपमहापौर धनंजय जाधव यांच्या संकल्पनेतून साकारणारे ग्रीनसीटी प्रोजेक्ट ठरणार आदर्श पर्यावरण प्रकल्प असे प्रतिपादन सकल माळी समाजाचे नेप्ती विभाग प्रमुख रामदास फुले यांनी केले आहे. उपमहापौर धनंजय जाधव यांचा सकल माळी समाजाच्या वतीने सत्कार करून सन्मान करण्यात आला . तसेच शहरात राबवणारे ग्रीन सिटी प्रोजेक्ट ला सकल माळी समाजाने पाठिंबा दिला आहे. याप्रसंगी सकल माळी समाजाचे उपाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ, विश्वस्त विनोद पुंड, राजेंद्र पडोळे,नेप्ती विभाग प्रमुख रामदास फुले, कोरकमिटी सदस्य अनिल इवळे,अमोल भांबरकर,चंद्रकांत पुंड,कॅप्टन सुधीर पुंड,सुरेश कावळे, रमेश चिपाडे, डॉ.दामोदर कळमकर, रोहित पठारे, गणेश कोल्हे आदी उपस्थित होते.

बाळासाहेब भुजबळ म्हणाले, उपमहापौर धनंजय जाधव यांनी अहिल्यानगर शहराला दिशा देणारा ग्रीन सिटी प्रकल्प हाती घेतला आहे. या ग्रीन सिटी प्रोजेक्ट ला शहरातील नागरिकांनी मोठा प्रतिसाद दिला आहे. सध्याच्या काळात वाढते तापमान कमी होणेसाठी पर्यावरणाच्या दृष्टीने शहरात मोठ्या प्रमाणात झाडे लावण्याची गरज आहे.

# आमदार दातेंच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत दिग्गजांचा राष्ट्रवादीत प्रवेश

पारनेर : (स. गांवकरी)



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या २७ व्या वर्धापन दिनानिमित्त माटुंगा, मुंबई येथील षण्मुखानंद सभागृहात आयोजित भव्य कार्यक्रमादरम्यान पारनेर तालुक्याच्या राजकारणात मोठी घडामोड घडली. पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत तालुक्यातील विविध पक्षांतील अनेक दिग्गज नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा, उपमुख्यमंत्री ना. सुनेत्राताई पवार, प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे, माजी मंत्री दिलीप वळसे पाटील, माजी मंत्री धनंजय मुंडे, पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते, जिल्हा बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड यांचे उपस्थित संपन्न झाला. या प्रवेशामध्ये माजी जिल्हा परिषद सदस्य वसंतराव चेडे, भाळवणी येथील उद्योजक शिवसेना शिंदे गटाचे संदिप रोहोकले, भाजपचे नगरसेवक अशोक चेडे, माजी उपनगराध्यक्ष दत्तात्रय कुलट, शिवसेनेचे उबाठा नगरसेवक नवनाथ सोबले, कांतीलाल ठाणगे, भाऊ ठुबे, माऊली औटी, सिद्धेश्वरवाडी माजी सरपंच आप्पासाहेब नरोडे तसेच योगेश दावभट, विकास केरूभाऊ रोहोकले, पवन संजय रोहोकले, उद्धव गुंजाळ, दिलीप विश्वनाथ रोहोकले, संदीप बिबिशन साळुंके, हरिदास रंगनाथ रोहकले, सुनिल बाबाजी चेमटे, मच्छिंद्र गोपाळा रोहोकले, संतोष भाऊसाहेब रोहकले, दत्ता कृष्णा सुरुसे, राहुल दादाभाऊ गुंजाळ, मनोहर विठ्ठल रोहोकले यांसह पारनेर शहर व तालुक्यातील अनेक कार्यकर्त्यांचा समावेश आहे.

पारनेर तालुक्यातील विविध राजकीय प्रवाहांतील प्रभावी नेत्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसची वाट धरल्याने स्थानिक राजकारणात नव्या समीकरणांची चर्चा सुरू झाली आहे. विशेषतः आगामी नगरपंचायत, ग्रामपंचायत आणि इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर या पक्षप्रवेशाला मोठे राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे. या प्रवेशामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची ताकद आणखी वाढली असून तालुक्यातील राजकीय वातावरण ढवळून निघाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

गेल्या काही काळात आमदार काशिनाथ दाते यांनी मतदारसंघात राबविलेल्या विकासकामांमुळे, सर्वसामान्य नागरिकांशी ठेवलेल्या सातत्यपूर्ण संपर्कामुळे आणि सर्वसमावेशक नेतृत्वामुळे विविध पक्षांतील नेते व कार्यकर्ते राष्ट्रवादी काँग्रेसकडे आकर्षित होत आहे.

"आमदार काशिनाथ दाते सर यांची जनसामान्यांशी असलेली नाळ, विकासकामांबाबतची तळमळ आणि सर्वसमावेशक कार्यपद्धती यांच्यावर विश्वास ठेवून आम्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे. आज तालुक्यातील नागरिकांमध्ये दाते सरांच्या कामाची सकारात्मक चर्चा असून त्यांच्या नेतृत्वाभोवती विश्वासाचे मजबूत वलय निर्माण झाले आहे. विकासाच्या राजकारणाला प्राधान्य देणाऱ्या या नेतृत्वासोबत काम करण्याचा निर्णय आम्ही घेतला असून आगामी काळात पारनेर तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अधिक बळकट होईल, असा आम्हाला ठाम विश्वास आहे."

**- संदीप रोहोकले, उद्योजक भाळवणी**

"आज स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या विकासाभिमुख व सर्वसमावेशक विचारसरणी मधून घालून दिलेल्या आदर्शांच्या जोरावर मार्गक्रमण करत असलेल्या पक्षात अनेक मान्यवरांनी प्रवेश करण्याचा घेतलेला निर्णय निश्चितच अभिमानास्पद राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षा तथा उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षाची संघटनात्मक ताकद दिवसेंदिवस अधिकच वाढत आहे. पारनेर तालुक्यात आमदार दाते सरांच्या नेतृत्वाच्या माध्यमातून जनतेचा दृढ विश्वास संपादन केला जात असल्याचे हे उत्तम उदाहरण असून त्यांच्यावरील विश्वासामुळेच विविध पक्षांतील नेते आणि कार्यकर्ते राष्ट्रवादी काँग्रेसकडे आकर्षित होत आहेत. आगामी काळात हा वाढता जनाधार पक्षाला अधिक बळ देणारा ठरेल, असा मला ठाम विश्वास आहे."

**- प्रशांत गायकवाड, राष्ट्रवादी नेते**

# थोडक्यात पण महत्वाचे



## ठाण्यातील तलावपाळी हत्येनंतर काँग्रेसचा हल्लाबोल; गुन्हेगार मोकाट

ठाणे (स. गांवकरी) : तलावपाळी परिसरात घडलेल्या धक्कादायक हत्येच्या घटनेनंतर ठाणे जिल्हा काँग्रेसने आक्रमक भूमिका घेत शहरातील वाढत्या गुन्हेगारी आणि अमली पदार्थांच्या विळख्याविरोधात एल्गार पुकारला आहे. नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आणत काँग्रेसने प्रशासनाकडे त्वरित उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. घटनेच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसच्या शिष्टमंडळाने पोलिस प्रशासन, ठाणे महानगरपालिका आणि अतिक्रमण विभागाच्या अधिकाऱ्यांसमवेत तलावपाळी परिसराची संयुक्त पाहणी केली. यावेळी परिसरातील संशयास्पद हालचाली, अमली पदार्थांचे व्यसनी, ड्रग्ज विक्रेते आणि समाजकंटकांविरोधात तातडीने कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. तलावपाळीसारख्या गर्दीच्या आणि महत्त्वाच्या ठिकाणी घडलेल्या हत्येच्या घटनेमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम करण्याची गरज काँग्रेसने अधोरेखित केली. परिसरात २४ तास पोलीस बंदोबस्त, वाढीव गस्त, सीसीटीव्ही यंत्रणेचे प्रभावी जाळे आणि ड्रग्जविरोधी विशेष मोहीम राबविण्याची मागणीही करण्यात आली. ठाणेकरांच्या सुरक्षिततेशी कोणतीही तडजोड स्वीकारली जाणार नाही. शहरातील वाढती गुन्हेगारी आणि ड्रग्ज माफियांचा प्रभाव रोखण्यासाठी प्रशासनाने कारवाई करावी," अशी भूमिका काँग्रेसने मांडली. तसेच, नागरिकांना सुरक्षित वातावरण देण्यात प्रशासन अपयशी ठरल्यास आणि मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास काँग्रेसकडून तीव्र जनआंदोलन उभारण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला. या पाहणी दौऱ्यात काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## आरोपी मातोश्री रमाबाई आंबेडकर नगर झोपडपट्टीमधील रहिवासी

सोलापूर (स. गांवकरी) : सोलापूर बसस्थानकामध्ये तमिळनाडू येथील नागरिकाचा खून करण्यात आला होता. या खुनाच्या प्रकरणातील तीन ही आरोपी हे मातोश्री रमाबाई आंबेडकर नगर मधील रहिवासी असून त्यांना अटक करण्यात आली आहे. संबंधित व्यक्तीची लूट करून त्याची हत्या करण्यात आली आहे. मातोश्री रमाबाई आंबेडकर नगर न्यू बुधवार पेठ, सिटी बस डेपो पाठीमागे येथील कुणाल किशन कांबळे (वय २१ वर्षे) आणि अमन सुधाकर जेटीथोर ( वय २२ वर्षे ) आणि आणखी एक अल्पवयीन मुलगा असे आरोपींची नावे आहेत. सोलापूर एस.टी. बसस्थानक परिसरात घडलेल्या खळबळजनक खूनप्रकरणाचा फौजदार चावडी पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण (डी.बी.) पथकाने अवघ्या २४ तासांत छडा लावत दोन आरोपींना अटक केली असून एका विधीसंघर्षग्रस्त बालकाला ताब्यात घेतले आहे. या जलद कारवाईमुळे पोलिसांच्या तपासकौशल्याची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, तमिळनाडू राज्यातील काईम्बतूर जिल्ह्यातील रहिवासी कृष्णाप्रसाद व्ही हे हैदराबादहून साताऱ्याकडे प्रवास करत असताना सोलापूर एस.टी. बसस्थानकातील फलाट क्रमांक २३ जवळ त्यांच्यावर अज्ञात व्यक्तींनी हल्ला केला. डोक्यात गंभीर मार लागल्याने त्यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी त्यांच्या कन्या प्रकृती कृष्णाप्रसाद यांनी दिलेल्या फिर्यादीवरून फौजदार चावडी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम १०३ अंतर्गत खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला.

## मृत्युशी झुंज देणाऱ्या १५ वर्षांच्या वडाच्या झाडाचे पुनर्रोपण



श्रीगोंदा (स. गांवकरी) : वीज वितरणाला अडथळा ठरत असल्याने काढण्यात आलेल्या श्रीगोंदा शहरातील स्टेशन रोडवरील सुमारे १५ वर्षे जुन्या वडाच्या झाडाला नवजीवन देण्यासाठी श्रीगोंद्यातील वृक्षप्रेमींनी पुढाकार घेत पुनर्रोपणाचा स्तुत्य उपक्रम राबविला. जगतगुरू संत तुकाराम महाराज वृक्ष संवर्धन समितीचे अध्यक्ष नवनाथ दरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवारी क्रेनच्या सहाय्याने हे झाड वन विभागाच्या जागेत स्थलांतरित करून पुनर्रोपित करण्यात आले. रस्त्याच्या कडेला उभे असलेले हे वडाचे झाड मृत्यूशी झुंज देत असल्याने ते वाचविण्याचा निर्णय वृक्षप्रेमींनी घेतला. झाडाच्या पुनर्रोपणासाठी जेसीबीच्या सहाय्याने खड्डा खोदण्यात आला. यासाठी धनराज कोंथबीरे आणि जमीर जकाते यांनी सहकार्य केले. तसेच नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी पुष्पगंधा भगत यांनी पाच हजार लिटर क्षमतेचा पाण्याचा टँकर उपलब्ध करून दिला. सुमारे तीन फूट व्यास आणि दहा फूट उंची असलेल्या वडाच्या झाडाचे यशस्वी पुनर्रोपण झाल्याने उपस्थित वृक्षप्रेमींमध्ये उत्साहाचे वातावरण होते. यावेळी जिल्हा परिषद समाजकल्याण समितीचे माजी सभापती उमेश प्रहार म्हणाले, "जगतगुरू संत तुकाराम महाराज वृक्ष संवर्धन समितीने वृक्षलागवड आणि संवर्धनासाठी चांगली चळवळ उभी केली आहे. पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज असून सर्व नागरिकांनी या उपक्रमात योगदान देणे आवश्यक आहे." या उपक्रमात माजी उपनगराध्यक्ष अशोक खेंडके, धनराज कोंथबीरे, नवनाथ दरेकर, नानासाहेब कोंथबीरे, ऋतिक शिंदे, उमेश प्रहार, संजय पटवा, प्रा. बापू देवकर, ॲड. सुनील दरेकर, गौरव मेहेत्रे, जमीर जकाते आणि झहीर जकाते यांनी श्रमदान करून सहभाग नोंदविला. वृक्षसंवर्धनाच्या दृष्टीने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे शहरवासीयांकडून कौतुक होत आहे.

## लिंपणगाव ग्रामपंचायतचे आरक्षण सोडत जाहीर

श्रीगोंदा तालुका (स. गांवकरी) : श्रीगोंदा तालुक्यातील राजकीय क्षेत्रात महत्त्वाच्या समजल् जाणाऱ्या लिंपणगाव ग्रामपंचायतचे आरक्षण सोडत दिनांक 10 जून रोजी जाहीर करण्यात आले. आगामी सार्वत्रिक निवडणुकीसाठी सदस्य पदाच्या आरक्षणाची सोडत ग्रामपंचायत कार्यालय मध्ये उत्साहाच्या वातावरणात पार पडली. आरक्षण नियमावलीनुसार पाच प्रभागातील एकूण 13 सदस्य पदाचे आरक्षण निश्चित करण्यात आले असून, सोडत जाहीर होताच गावातील आता राजकीय घडामोडीला वेग आला आहे. दरम्यान जाहीर करण्यात आलेल्या आरक्षणानुसार प्रभाग क्रमांक एक मध्ये नागरिकांचा मागास प्रवर्ग, सर्वसाधारण महिला व सर्वसाधारण, तर प्रभाग क्रमांक दोन मध्ये नागरिकांचा मागास प्र वर्ग महिला, सर्वसाधारण महिला व सर्वसाधारण प्रभाग क्रमांक तीन मध्ये नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला, सर्वसाधारण महिला व सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक चार मध्ये दोन जागा असून येथे अनुसूचित जाती महिला व सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक पाच सर्वसाधारण महिला व सर्वसाधारण अशा प्रकारे या प्रभागामध्ये सोडत निश्चित करण्यात आले. तर प्रभाग क्रमांक चार मध्ये अनुसूचित जाती महिलांसाठी चिट्ठी पद्धतीने सोडत जाहीर करण्यात आली.

# प्रवरा नदीकाठच्या शेतकऱ्यांच्या विद्युत पंपांची तोडफोड

### लाखो रुपयांची कॉपर वायर चोरी!







डॉ. विश्वासराव आरोटे
कळसुबाई शिखरावरून

(स. गांवकरी)

अकोले तालुक्यातील प्रवरा नदी पात्रालगत असलेल्या शेतकऱ्यांच्या विद्युत पंपांवर चोरट्यांनी पुन्हा एकदा डल्ला मारत मोठ्या प्रमाणावर नुकसान केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. काल रात्री अज्ञात चोरट्यांनी नदीकाठावरील सुमारे २५ ते ३० शेतकऱ्यांच्या विद्युत मोटार पंपांची तोडफोड करून त्यामधील लाखो रुपयांची कॉपर वायर चोरी केल्याने परिसरातील शेतकऱ्यांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे.

प्रवरा नदीला आवर्तन सुटल्याने सध्या शेतकरी आपल्या पिकांसाठी नदीतील पाण्यावर अवलंबून आहेत. अशा परिस्थितीत चोरट्यांनी विद्युत पंपांची तोडफोड करून कॉपर वायर लंपास केल्याने शेतकऱ्यांसमोर सिंचनाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे, चोरी करण्यासाठी चोरट्यांनी मोठ्या हातोड्यांचा वापर करून मोटारींची अक्षरशः नासधूस केली असून त्यामुळे शेतकऱ्यांचे दुहेरी नुकसान झाले आहे.

या घटनेबाबत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा प्रगतशील शेतकरी शिवाजीराव नाईकवाडे यांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. ते म्हणाले की, "एकीकडे शेतमालाला बाजारभाव नाही, तर दुसरीकडे मुलाबाळांच्या तोंडचा घास वाचवण्यासाठी शेतकरी कर्ज काढून विद्युत पंप बसवतो. मात्र चोरटे वारंवार हे पंप फोडून कॉपर वायर चोरी करत आहेत. पोलिसांकडे गुन्हे दाखल होतात, पण त्याचा तपास कुठपर्यंत पोहोचतो हे कोणालाच समजत नाही." नाईकवाडे यांनी पोलिस प्रशासनावरही गंभीर प्रश्न उपस्थित करत, "जर पोलिसांना चोरांचा शोध घेता येत नसेल तर आम्हाला सांगा, आम्हीच त्यांचा शोध घेऊ. अनेक वेळा चोर पकडले जातात, पण चोरीचे प्रकार मात्र थांबत नाहीत. हा चोर आणि पोलिसांचा शिवापालवीचा खेळ तर नाही ना?" असा संतप्त सवाल केला.

यापूर्वीही पंधरा दिवसांपूर्वी सुगाव व रेडे परिसरातील नदीकाठच्या शेतकऱ्यांच्या विद्युत पंपांची चोरी झाली होती. मात्र त्या घटनेतील आरोपींचा ठोस बंदोबस्त झाल्याचे दिसून आले नाही. त्यामुळे चोरट्यांचे मनोबल वाढल्याची चर्चा परिसरात सुरू आहे.

भिंगारे मंगल कार्यालयापासून रेडेपर्यंत तसेच नाईकवाडी पेट्रोल पंप परिसरातील नदीकाठच्या शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. अनेक शेतकऱ्यांच्या मोटारी पूर्णपणे निकामी झाल्या असून त्यांची दुरुस्ती करण्यासाठी हजारो रुपयांचा खर्च येणार आहे. त्यामुळे आधीच आर्थिक संकटात सापडलेल्या बळीराजावर आणखी एक मोठे संकट ओढवले आहे. शेतकऱ्यांनी श्रीरामपूर विभागाचे पोलीस उपविभागीय अधिकारी सोमनाथ वाकचौरे यांनी या प्रकरणात तातडीने लक्ष घालून विशेष तपास पथक नेमावे, अशी मागणी केली आहे. "सदरक्षणाय खलनिग्रहणाय" या पोलिसांच्या ब्रीदवाक्यानुसार आता तरी पोलिसांनी कठोर कारवाई करून चोरट्यांना जेरबंद करावे, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करत आहेत.

प्रवरा नदीतून पाणी वाहत असताना शेतकऱ्यांना पिकांसाठी त्याचा उपयोग करता येत नाही, ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. लाखो रुपयांचे नुकसान सहन करणाऱ्या शेतकऱ्यांना न्याय मिळणार का आणि या चोरट्यांच्या टोळीवर पोलिस प्रशासन आळा घालणार का, याकडे संपूर्ण अकोले तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# खारे कर्जुने शिवारात बॉम्बचा स्फोट; एका जणाचा मृत्यू

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

नगर तालुक्यातील खारे कर्जुने शिवारात लष्कराच्या सरावावेळी न फुटलेल्या बॉम्बचा अचानक स्फोट होवून त्या परिसरात शेळ्या चारण्यासाठी गेलेल्या एकाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना १० जून रोजी दुपारी घडली.

संजय दशरथ गायकवाड (वय ५२, रा. खारे कर्जुने, ता.नगर) असे मयताचे नाव आहे. मयत गायकवाड हे वीट भट्टीवर मजुरी काम करत होते, तर त्यांच्या कडे काही शेळ्या ही पाळलेल्या होत्या. वीट भट्टीवर काम नसल्यास ते इतर ठिकाणी मजुरी करायचे तर कधी शेळ्या चारायला घेवून जायचे. खारे कर्जुने गावच्या जवळच लष्कराचे के. के. रेंज हे युद्ध सराव क्षेत्र आहे.

या ठिकाणी गेल्या काही दिवसांपासून युद्ध सराव सुरु होता. त्याबाबत लष्कराच्या वतीने ग्रामपंचायतला माहिती देण्यात आली होती. त्यामुळे ग्रामपंचायत ने ध्वनीक्षेपकावर ग्रामस्थांना के. के. रेंज परिसराकडे न जाण्याच्या सूचनाही दिलेल्या होत्या. मात्र तरीही मयत गायकवाड हे शेळ्या चारण्यासाठी त्या भागाकडे गेले, शेळ्या चारत असताना त्यांना लष्करी सरावावेळी न फुटलेला बॉम्ब दिसला. त्यांनी तो निकामी झालेला असावा असे समजून उचलला आणि दगडावर ते तो आदळू लागले. त्याच वेळी त्या बॉम्बचा अचानक स्फोट झाला. त्यात गायकवाड हे जागीच ठार झाले. त्यावेळी तेथे असलेली १ शेळी ही दगावली तर १ शेळी जखमी झाली. स्फोटाच्या आवाजाने काही नागरिकांनी तेथे धाव घेत पोलिसांना व गायकवाड यांच्या नातेवाईकांना माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. मयत गायकवाड यांच्या मृतदेहाचे जिल्हा शासकीय रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले.

# मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशाने १९ अधिकारी बदलले

### पोलिस दलात नवी मांडणी

अहिल्यानगर : (स. गांवकरी)



जिल्हा पोलिस दलात प्रशासकीय पातळीवर महत्त्वपूर्ण फेरबदल करण्यात आले असून, १९ पोलिस निरीक्षक व सहाय्यक पोलिस निरीक्षकांच्या जिल्हांतर्गत बदल्यांचे आदेश पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी जारी केले आहेत. जिल्हा पोलिस आस्थापना मंडळाच्या शिफारशीवरून ही खांदेपालट करण्यात आली आहे.

या बदल्यांमध्ये स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांची शिर्डी येथील साई मंदिर सुरक्षा विभागात नियुक्ती करण्यात आली आहे. तर शहरातील महत्त्वाच्या कोतवाली पोलिस ठाण्याची जबाबदारी नितीन देशमुख यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. तसेच तोफखाना पोलिस ठाण्याचे नवे निरीक्षक म्हणून बालाजी वैद्य यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पोलिस अधीक्षकांच्या आदेशानुसार जगदीश छबूराव भांबळ यांची तोफखाना पोलिस ठाण्यातून नियंत्रण कक्षात बदली करण्यात आली आहे. रवींद्र नरसिंग देशमुख यांना नियंत्रण कक्षातून राहुरी पोलिस ठाण्यात, विलास सहादू पुजारी यांना पाथर्डी पोलिस ठाण्यातून मानव संसाधन विभागात, तर संभाजी अभिमन्यू गायकवाड यांना कोतवाली पोलिस ठाण्यातून दक्षिण विभागात नियुक्त करण्यात आले आहे. याशिवाय किरण बाजीराव शिंदे यांची श्रीगोंदे पोलिस ठाण्यातून एचटीयू विभागात, संजय राजाभाऊ ठेंगे यांची राहुरीहून श्रीगोंदे पोलिस ठाण्यात, तर नितीन भास्कर देशमुख यांची श्रीरामपूर शहर पोलिस ठाण्यातून कोतवाली पोलिस ठाण्यात बदली करण्यात आली आहे.

आनंद अशोक कोकरे यांना मानव संसाधन विभागातून पाथर्डी पोलिस ठाण्यात, प्रताप पांडुरंग दराडे यांना नियंत्रण कक्षातून नेवासे पोलिस ठाण्यात आणि बाबासाहेब दादू बोरसे यांना शहर वाहतूक शाखेतून घारगाव पोलिस ठाण्यात नियुक्त करण्यात आले आहे. तसेच महेश विष्णू पाटील यांची नियंत्रण कक्षातून शहर वाहतूक शाखेत, दीपक पुंडलिक सरोदे यांची राहाता पोलिस ठाण्यात, बालाजी मदनराव वैद्य यांची एचटीयू विभागातून तोफखाना पोलिस ठाण्यात आणि हनुमान लहानू गायकवाड यांची कर्जत पोलिस ठाण्यात नियुक्ती करण्यात आली आहे.

### सहाय्यक पोलिस निरीक्षकांमध्येही फेरबदल

जिल्हा पोलिस दलातील सहाय्यक पोलिस निरीक्षकांच्या बदल्यांमध्येही महत्त्वाचे फेरबदल करण्यात आले आहेत. युवराज अर्जुनराव आठरे यांची आर्थिक गुन्हे शाखेतून लोणी पोलिस ठाण्यात, माणिक भाऊसाहेब चौधरी यांची एमआयडीसी पोलिस ठाण्यातून आर्थिक गुन्हे शाखेत, तर जगदीश मुलगीर यांची भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यातून आर्थिक गुन्हे शाखेत बदली करण्यात आली आहे. याशिवाय तेजश्री विठ्ठल थोरात यांची कोतवाली पोलिस ठाण्यातून भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यात आणि हेमंत शिवाजी थोरात यांची घारगाव पोलिस ठाण्यातून एमआयडीसी पोलिस ठाण्यात नियुक्ती करण्यात आली आहे. या व्यापक खांदेपालटीमुळे जिल्ह्यातील पोलिस प्रशासन अधिक गतिमान व प्रभावी करण्याचा प्रयत्न असल्याचे मानले जात आहे.

# निर्भिक इतिहास संशोधक आणि पत्रकारांची परंपरा भूषण देशमुख यांनी गौरवीत केली - माजी मंत्री बाळासाहेब थोरात

अहिल्यानगर : (स. गांवकरी)



अहिल्यानगर जिल्ह्यात पत्रमहर्षी वा.द. कस्तुरे - दिनमित्रकार मुकुंदराव पाटील इ.पत्रकार आणि सुरेश जोशी - सरदार मिरीकर यांच्यासारख्या इतिहास संशोधकांनी निर्भिकता आणि निष्पक्षतेची एक परंपरा निर्माण केली. पत्रकार आणि इतिहास संशोधक म्हणून या परंपरा भूषण देशमुख यांनी गौरवीत केल्या. नगरची सद्भावनेची संस्कृती आणि खरा इतिहास तळमळीने मांडणारा वैचारिक विश्वातील अढळ ध्रुवतारा भूषण यांच्या निधनामुळे हरपला, अशा शब्दात माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. स्वर्गीय देशमुख यांच्या कुटुंबीयांची आज श्री. थोरात यांनी त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. यावेळी त्यांच्यासोबत इतिहासप्रेमी, हेरिटेज व उपक्रम आणि सामाजिक कार्यकर्ते होते. पत्रकार आणि इतिहास संशोधक म्हणून भूषण यांच्याशी जुळलेल्या ऋणानुबंधाला श्री.थोरात यांनी उजाळा दिला. सहकारमहर्षी स्व. भाऊसाहेब थोरात यांनी भूषण यांच्या समवेत नगर मधील सर्व ऐतिहासिक ठिकाणांना भेटी दिल्या आणि तेथील इतिहास जाणून घेतला. "भूषण यांच्या समवेत नगरच्या पंचक्रोशीतील ऐतिहासिक ठिकाणांना भेटी दिल्यावर आपण जगातल्या अद्वितीय शहर आणि जिल्ह्यात राहतो, याची जाणीव होते," ही त्यावेळी वृत्तपत्रातून प्रसिद्ध झालेली भाऊसाहेबांची प्रतिक्रिया श्री बाळासाहेब थोरात यांनी आवर्जून नमूद केली. श्री.थोरात म्हणाले की,दैनिक केसरी ,लोकसत्ता, दिव्य मराठी इत्यादी वृत्तपत्रात काम करीत असताना त्यांनी आपल्या अभ्यासू वृत्ती आणि प्रामाणिकतेने सर्वांना प्रभावित केले.

रेडिओ नगर 90.4 एफएम हे रेडिओ माध्यम त्यांनी सर्वसामान्य नगरकरांचे व्यासपीठ बनवले. इतिहास कोणाला बदलता येत नाही आणि तो कोणाला माफही करत नाही, हे परखडपणे सांगणारे देशमुख हे निजामी आणि मराठा इतिहासाचे साक्षेपी भाष्यकार होते.

कला - साहित्य - संस्कृती या विषयांची सखोल जाण आणि रुची असणाऱ्या देशमुख यांची स्मृती आणि प्रेरणा पुढील पिढीसाठी अमूल्य संचित आहे, असे श्री थोरात म्हणाले. श्री देशमुख यांच्या जीवनकार्याची प्रेरणा अखंड प्रज्वलित ठेवण्यासाठी स्थायी स्वरूपाची योजना नगर शहरात निर्माण करण्यासाठी आपण सहयोग देऊ,असेही श्री. थोरात यांनी सांगितले.

# अहिल्यानगरमध्ये लकीड्रॉच्या आमिषाने अनेकांना गंडा

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

महागड्या वस्तूंचे आमिष दाखवून शहर व तालुक्यातील अनेक नागरिकांची आर्थिक फसवणूक केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. सोलापूर व करमाळा येथून आलेल्या ८ ते १० जणांच्या टोळीने एका नावाने लकी ड्रॉ सुरू करून हा गंडा घातला. याप्रकरणी फसवणूक झालेल्या नागरिकांनी राहुरी पोलिस ठाण्यात तक्रार अर्ज दाखल केला आहे.

याबाबत माहिती अशी की, ५ ते ६ महिन्यांपूर्वी सोलापूर व करमाळा येथून दोन महिला व काही पुरुषांची एक टोळी राहुरी शहरात आली होती. त्यांनी शहरात एका नावाने लकी ड्रॉ योजना सुरू केली. या योजनेमध्ये बक्षीस म्हणून चारचाकी कार, दुचाकी, लॅपटॉप, मोबाईल, सोने, गॅस शेगडी, कुट्टी मशीन, कुलर व शिलाई मशीन, अशा आकर्षक वस्तू ठेवल्या होत्या. या टोळीने राहुरी शहरासह तालुक्यातील टाकळीमिया, म्हैसगाव, ताहराबाद, कोंढवड, शिंगणापूर, शिलेगाव, तांदुळवाडी आदी गावांतील सुमारे ४०० महिला व पुरुषांना ५०० रुपये फी घेऊन या लकी ड्रॉचे सभासद करून घेतले. शहरात असलेल्या एका लॉन्समध्ये प्रत्येक शनिवारी हा लकी ड्रॉ काढला जात असे. त्यावेळी सर्व सभासदांकडून नियमित साप्ताहिक हप्ता भरून घेतला जात होता. सुमारे १० ते १२ हप्ते होईपर्यंत या टोळीने काही किरकोळ बक्षिसे देऊन लोकांचा विश्वास संपादन केला. त्यानंतर, तुम्हाला चारचाकी कार व मोटारसायकल सारखे मोठे बक्षीस काढून देतो, असे आमिष दाखवून अनेक जणांकडून प्रत्येकी ५० हजार रुपये जमा करून घेतले. अशा प्रकारे संपूर्ण तालुक्यातून लाखो रुपये गोळा केल्यानंतर सदर टोळी लकी ड्रॉ बंद करून रातोरात पसार झाली.

# प्रलंबित मोजणी प्रकरणे निकाली काढण्यासाठी प्रशासन सरसावले

### 'शेतकऱ्यांच्या संघर्षाला यश'

### शैलेश नवाल यांचा सन्मान

अहिल्यानगर : (स. गांवकरी)




राज्यातील शेतकऱ्यांच्या प्रलंबित जमीन मोजणी, हद्दनिश्चिती आणि शेतरस्त्यांच्या प्रश्नांवर सकारात्मक हालचाली सुरू झाल्या असून, जमाबंदी आयुक्त शैलेश नवाल यांनी कार्यभार स्वीकारल्यानंतर घेतलेल्या निर्णयांमुळे भूमिअभिलेख विभागात "झिरो पेण्डन्सी"च्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले जात आहे. या निर्णयांमुळे महाराष्ट्र राज्य शिवपाणंद शेतरस्ता चळवळीच्या सातत्यपूर्ण संघर्षाला मोठे यश मिळाल्याची भावना चळवळीचे प्रणेते शरद पवळे यांनी व्यक्त केली.

राज्यातील हजारो शेतकरी वर्षानुवर्षे प्रलंबित असलेल्या मोजणी प्रकरणांमुळे त्रस्त होते. पारनेर तालुक्यातच सुमारे २,५०० हून अधिक मोजणी प्रकरणे रखडली असून, शेतरस्ते, हद्दनिश्चिती आणि मालकी हक्काच्या प्रश्नांमुळे शेतकऱ्यांना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत होता. सध्या भूमिअभिलेख विभागात केवळ ८ नियमित कर्मचारी कार्यरत असून १८ खासगी व कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मदतीने कामकाज सुरू आहे. प्रलंबित २,२३३ मोजणी प्रकरणांपैकी ९७३ प्रकरणांना तारखा देण्यात आल्या असून १,२६० प्रकरणांना अद्याप तारखा देणे बाकी आहे. उपअधीक्षक वर्ग-२ ची दोन पदे आणि वर्ग-३ ची नऊ पदे रिक्त असल्याने कामकाजावर अतिरिक्त ताण निर्माण झाला आहे.

या पार्श्वभूमीवर राज्यभरातील भूमिअभिलेख कार्यालयांना अतिरिक्त मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याचा तसेच खाजगी भूकरमापकांची नियुक्ती करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे मोजणी प्रक्रियेला वेग मिळून शेतकऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांचा निपटारा जलदगतीने होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

महाराष्ट्र राज्य शिवपाणंद शेतरस्ता चळवळीचे प्रणेते तथा अध्यक्ष शरद पवळे आणि राज्य प्रसिद्धी प्रमुख रविंद्र खुडे यांनी या निर्णयाचे स्वागत करताना सांगितले की, "शेतकऱ्यांच्या हक्कासाठी केलेल्या संघर्षाची शासनाने दखल घेतली आहे. जमाबंदी आयुक्त शैलेश नवाल यांच्या सकारात्मक भूमिकेमुळे राज्यातील शेतरस्ते आणि मोजणी प्रश्नांना न्याय मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे."

पारनेर तालुक्यातील प्रलंबित मोजणी प्रकरणे येत्या दोन महिन्यांत निकाली काढण्याचे नियोजन करण्यात आले असून, उपअधीक्षकांसह सुमारे २० अतिरिक्त भूकरमापकांची नियुक्ती करण्यासाठी हालचाली सुरू आहेत. तसेच "रोड मॉडेल व्हिलेज" संकल्पनेअंतर्गत गावांतील सर्व शेतरस्त्यांच्या हद्दी निश्चित करून झिरो पेण्डन्सीचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील असल्याचे सांगण्यात आले.

दरम्यान, जमाबंदी आयुक्त शैलेश नवाल यांच्या कार्याची दखल घेत महाराष्ट्र राज्य शिवपाणंद शेतरस्ता चळवळीच्या वतीने गुरुवार, दि. ११ जून २०२६ रोजी पुणे येथील कार्यालयात शरद पवळे आणि रविंद्र खुडे यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सन्मान केला.

यावेळी प्रसारमाध्यमांशी बोलताना शरद पवळे म्हणाले की, "राज्यातील गरजू शेतकऱ्यांच्या हक्काच्या प्रश्नांवर न्याय मिळवून देण्यासाठी महाराष्ट्र राज्य शिवपाणंद शेतरस्ता चळवळ यापुढेही संघर्षाची भूमिका कायम ठेवणार आहे."


# वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रम



**नांदेड : (स. गांवकरी)**

वडेपुरी ता. लोहा येथील प्रसिद्ध माता अन्नपूर्णा देवी मंदिराच्या ११ व्या स्थापना वर्धापन दिनाचे औचित्य साधून आणि युवा साहित्यिक, ग्रंथप्रेमी तथा सुप्रसिद्ध चित्र चारोळीकार सोनू दरेगावकर यांच्या वाढदिवसानिमित्त, दिनांक १२ जून २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेला 'जीवन-उत्सव: व्यसनमुक्त जनजागृती संकल्प' हा सोहळा अत्यंत उत्साहात आणि दिमाखात संपन्न झाला. या संपूर्ण सोहळ्याला परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. विविध सामाजिक उपक्रमांची रेलचेल केवळ औपचारिकता म्हणून वाढदिवस साजरा न करता, या प्रसंगी समाजाभिमुख उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत मंदिर परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. नेत्र तपासणी व रक्तदान शिबीर: ग्रामीण भागातील जनतेसाठी मोफत नेत्र तपासणी शिबीर आणि गरजू रुग्णांसाठी भव्य रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते, ज्याला तरुणांचा मोठा प्रतिसाद लाभला. अन्नदान: सोहळ्याचे औचित्य साधून उपस्थित सर्व भाविक आणि नागरिकांसाठी महाप्रसादाचे (अन्नदान) आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे वाढदिवसाचे औचित्य साधून कोणताही अनावश्यक खर्च न करता "हार-तुरे, केक आणि शाल आणू नये, शुभेच्छा म्हणून एक वृक्ष किंवा ग्रंथ सोबत घेऊन यावे" हा देण्यात आलेला संदेश!

या संकल्पामुळे सोहळ्याला एक वेगळीच वैचारिक आणि पर्यावरणपूरक दिशा मिळाली. आयोजकांचे मोलाचे योगदान हा संपूर्ण सुंदर सोहळा यशस्वी करण्यासाठी माता अन्नपूर्णा देवी-वडेपुरी येथील अध्यक्षा सौ. सुषमा विजयसिंह गहेरवार आणि माँ संतोषी मुलींचे वसतीगृह व बॉईज हॉस्टेल (नांदेड) च्या संचालिका सौ. जयश्री संजयकुमार जयस्वाल यांनी विशेष पुढाकार घेऊन उत्कृष्ट नियोजन केले होते. या प्रसंगी विविध क्षेत्रातील, रणजी क्रिकेटपटू सुनील गंगाधर जाधव, राहुल वाघमारे, भूषण सोनुले, संजयकुमार जयस्वाल, विजयसिंह गहेरवार, दत्तप्रसाद तालीमकर, राजू जाधव, सिंद्धात वाघमारे यांच्यासह याप्रसंगी शेकडो महिलांनी व मान्यवरांनी उपस्थित राहून सोनू दरेगावकर (निवेदक, गायक, समीक्षक, मिमिक्रीकार तसेच गोर-गरीब जनतेची हेल्पलाईन म्हणून परिचित) यांना त्यांच्या भावी वाटचालीस व सामाजिक कार्याला भरभरून शुभेच्छा दिल्या.



ठाणे : दिवा शहरातील बेडेकरनगर मध्ये मृतदेह नेण्यासाठी देखील रस्ता मिळेना अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. प्रसंगी समाजसेवक अमोल केंद्रे आक्रमक होत घटनास्थळी दाखल झाले. संबंधित ठिकाणी स्थानिकाने रस्ता बंद केल्याचे उघडकीस आल्याने पोलिसांना पाचरण करण्यात आले. ( फोटो - संतोष पडवळ )

## थोडक्यात बातम्या...



### श्री संत ज्ञानेश्वर महाराज रेडा समाधी रथोत्सवाचे भक्तिमय स्वागत

ओतूर (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्यातील रोहोकडी येथे आळे (ता. जुन्नर) येथील श्री रेडा महाराजांच्या समाधी रथाचे आगमन शुक्रवार दि. १२ जून रोजी सकाळी १० वाजता झाले. या रथाचे सन्माननीय ग्रामस्थ, भाविक भक्तांनी भक्तिमय वातावरणात स्वागत करून दर्शन घेतले. यावेळी रेडा समाधीच्या पादुका रथाचे स्वागत रंगनाथशेठ घोलप, माजी सरपंच सुदाम घोलप, ईश्वरशेठ केदारी, सचिन घोलप, वृषाली घोलप, शिल्पा घोलप, सुनीता घोलप, अमोल घोलप, पंकज घोलप, नवनाथ घोलप यांच्यासह गावातील भाविक भक्त व ग्रामस्थ यांनी केले. यावेळी रेडा समाधी देवस्थान ट्रस्टचे ट्रस्टचे संजय कु-हाडे व त्यांचे सर्व सहकारी, विणेकरी व भाविकांना फेटा, शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी सर्वांना अल्पोपहार म्हणून कांदा पोहे व चहापान देण्यात आला. देवस्थान ट्रस्ट आणि ग्रामस्थांच्या संयुक्त विद्यमाने श्री रेडेश्वर महाराजांची भव्य रथयात्रा आयोजित केली जाते. वारकरी संप्रदायात या समाधीला आळंदी आणि पंढरपूर इतकेच महत्त्व आहे ज्यांना पंढरपूर किंवा आळंदीची वारी करणे शक्य नसते, ते भाविक रेड्याच्या समाधीचे दर्शन घेतात. अधिक मासानिमित्त रेडा समाधीचा मुखवटा व पादुका घेऊन हा रथ जुन्नर व संगमनेर तालुक्यातील एकूण २७ गावांना भेट देत असून या पालखी सोहळ्यात जुन्नर तालुक्यातीतील वारकरी सांप्रदायातील सुमारे १०० हून अधिक भाविक भक्त सहभागी झाले आहेत.

### डुंबरवाडीत रुग्णसेवेसाठी मोफत ॲम्बुलन्स सेवेला प्रारंभ!



ओतूर (स. गांवकरी) : माळशेज नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, ठाणे यांच्या वतीने तसेच पत्रकार कैलास बोडके (खामुंडी) यांच्या पुढाकारातून रुग्णसेवेसाठी ॲम्बुलन्स सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या ॲम्बुलन्सच्या संपूर्ण व्यवस्थापन व नियंत्रणाची जबाबदारी पत्रकार कैलास बोडके हे सांभाळणार आहेत. सदर ॲम्बुलन्स आजपासून रुग्णांच्या सेवेसाठी उपलब्ध होणार असून तिचा लोकार्पण व उद्घाटन सोहळा आज सायंकाळी ७ वाजता श्री स्वामी समर्थ भक्ती शक्ती मंदिर, डुंबरवाडी येथे आयोजित करण्यात आला आहे. मंदिरातील श्री स्वामी समर्थांची आरती संपन्न झाल्यानंतर डुंबरवाडीच्या लोकनियुक्त सरपंच सौ. शीतलताई गोरे यांच्या शुभहस्ते या सेवेला प्रारंभ होणार आहे. या उपक्रमामुळे परिसरातील नागरिकांना आपत्कालीन वैद्यकीय सेवेसाठी मोठा दिलासा मिळणार असून ग्रामस्थांनी या सेवेचे स्वागत केले आहे. श्री स्वामी समर्थ भक्ती शक्ती मंदिर सेवा समितीने सर्व स्वामी भक्त व डुंबरवाडी ग्रामस्थांनी उद्घाटन सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.




### आरक्षण उपवर्गीकरण कायदा लागू करण्यासंदर्भात महापदयात्रेस प्रारंभ

बिलोली : (स. गांवकरी) : महाराष्ट्र सरकारने अनुसूचित जाती उपवर्गीकरणाचा कायदा लागू करून लाभ वंचितांना मिळून द्यावे या मागणी संदर्भात धर्माबाद ते मुबंई महापदयात्रेस ११ जूनपासून प्रारंभ झाला असून या पदयात्रेचं काल बिलोली नगरीत आगमन होताचे साठेनगर येथे स्वागताचा कार्यक्रम घेण्यात आला या दरम्यान दि.६ जूलै रोजी आझाद मैदान मुबंई येथे मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले. यावेळी लोकस्वराज्य आंदोलनाचे संस्थापक अध्यक्ष डॉ रांमचंद्र भंराडे,माजी नगराध्यक्ष भिमराव जेठ, व्ही.जी डोईवाड, रावसाहेब पवार, गणपत रेडी, जिल्हाध्यक्ष नागोराव कुडके, तालुकाध्यक्ष गंगाधर सिदलोन, पत्रकार गंगाधर कुडके, मार्तंड जेठे , संजय जेठे, प्रशांत कटारे, शेषेराव जेठे, गंगाधर जेठे,शुभम जेठेसह अनेक सामाजिक कार्यकर्ते व महिलांचा मोठ्या प्रमाणात सहभाग होता.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुकिंदर कुडके यांनी केलं तर आभार प्रदर्शन जिल्हाध्यक्ष नागोराव कुडके यांनी मानले तद्नंतर साठेनगर येथून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या पर्यंत रॅली काढून बाबासाहेबांना अभिवादन करण्यात आले मग त्या रॅलीचे मुबंई दिशेने जाणाऱ्या महापदयात्रेत रूपांतर झाले आहे.

# रुंदीकरणात जाणाऱ्या जमीनीचा योग्य मोबदला मिळावा



घोटी - त्र्यंबकेश्वर रस्त्याच्या रुंदीकरणात शेतकऱ्यांच्या शेतजमीनी, घरे, झाडे व फळझाडे जाणार आहे. तर काही शेतकरी भूमीहीन होणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना योग्य ती नुकसान भरपाई देण्यात यावी. अन्यथा आम्हा शेतकऱ्यांना आंदोलनाचा मार्ग निवडावा लागेल.

**- नागेश गायकर, शेतकरी कृती समिती अध्यक्ष**

**इगतपूरी : (स. गांवकरी)**

आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर इगतपुरी तालुक्यातील घोटी- त्र्यंबकेश्वर या रस्त्याच्या रुंदीकरणात शेतकऱ्यांच्या शेतजमीनी संपादन करण्याचे काम सुरू आहे. त्यामुळे रस्त्याच्या कामात शेतकऱ्यांच्या जमीनी, घरे, विहीर व फळझाडे आदी बाधित होणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळावा यासाठी आमदार हिरामण खोसकर यांच्या नेतृत्वाखाली कृती समितीचे अध्यक्ष नागेश गायकर व शेतकऱ्यांनी मुंबई येथे जाऊन मंत्रालयात कृषीमंत्री दत्ता भरणे, महसुल मंत्री चंद्रकांत बावनकुळे आणि सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले. निवेदनात म्हटले आहे की, घोटी - त्र्यंबकेश्वर रस्त्यात जे झाडे, फळ झाडें बाधित होणार आहे त्यांना योग्य मोबदला देण्यात यावा. नुकसान भरपाईचा निकष हा संपूर्ण सरसकट झाडे जे बाधित होणार आहे त्यांना देण्यात यावे. घोटी - त्र्यंबकेश्वर रस्त्यावरील धोकादायक घरे, इमारती, झाडें व इतर सर्व बाबी या ३० मीटरच्या हद्दीपासून ६ मीटरवर जे धोकादायक वास्तू येणार त्या बाधित करण्यात येऊन त्याची परत मुल्यामापन करून अहवाल सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी भू -संपादन अधिकारी यांना द्यावे.

आहुर्ली ते म्हसुर्ली हा रस्ता रोजगार हमी योजनेतुन करण्यात आला असून आजपर्यंत त्या रस्त्याचे संपादन झालेलं नसुन त्याचे ७/१२ उल्लेख केलेला नाही. मा. मंत्री बावनकुळे यांच्या आदेशानुसार जिल्हा अधिकारी यांनी तीन स्तरीय कमिटी नेमून त्यांना आहुर्ली ते म्हसुर्ली या रस्त्याची वहिवाट मोजमाप करण्यात सांगितले होते. मात्र सदर अधिकारी यांनी फक्त आहुर्ली ते म्हसुर्ली या रस्त्याची गाडीत बसून पाहणी करून कागदावर अंदाजे १४ ते १५ मीटर रस्त्याच्या रुंदीचा अहवाल जिल्हाधिकारी यांना दिला. या चुकीच्या अहवालास शेतकरी कृती समितीचा जोरदार विरोध आहे. या चुकीच्या अहवालामुळे शेतकरी यांचे आर्थिक नुकसान कसे होईल यावर जास्त भर दिला असं दिसतं आहे. यावेळी कृती समितीचे अध्यक्ष नागेश गायकर, सचिव गोरख वाजे, सल्लागार हनुमान मराडे, अंकुश महाले, अक्षय भोर, योगेश गोऱ्हे आदी उपस्थित होते.

# अमरनाथ यात्रेच्या नावाखाली फसवणूक

- नगर तालुक्यातील 'टूर अँड ट्रॅव्हल्स' चालकाविरुद्ध गुन्हा दाखल

**अहिल्यानगर : (स. गांवकरी)**

अमरनाथ आणि वैष्णोदेवी यात्रेचे तसेच हेलिकॉप्टर प्रवासाचे आमिष दाखवून ज्येष्ठ नागरिकांसह महिलांची लाखो रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी तोफखाना पोलिस ठाण्यात संशयित आरोपीविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. दिनेश पोपट भोर (रा. वडगाव गुप्ता, ता. जि. अहिल्यानगर) असे संशयित आरोपीचे नाव आहे. याबाबत स्मिता अनिल शितोळे (रा. सावेडी, अहिल्यानगर) यांनी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. आरोपी दिनेश भोर हा आमच्या दुकानावर आला. मार्च २०२५ मध्ये त्याने सांगितले की त्याचा 'बाबा अमरनाथ' या नावाने टूर अँड ट्रॅव्हल्सचा व्यवसाय आहे. त्यानंतर जुलै २०२५ मध्ये अमरनाथ, वैष्णोदेवी व अन्य धार्मिक स्थळांच्या सहलीचे नियोजन करण्यात आले होते. तुम्हाला हेलिकॉप्टरने दर्शनासाठी घेऊन जाऊ, कोणताही त्रास होऊ देणार नाही, असे खोटे आश्वासन देऊन आरोपीने फिर्यादी आणि त्यांच्या मैत्रिणींचा विश्वास संपादन केला. आरोपीने हेलिकॉप्टर प्रवासासह प्रति व्यक्ती ३२,५०० रुपये आणि वाहनाने जाणाऱ्यांसाठी २६,५०० रुपये असा खर्च ठरवून आरोपीने ७ महिला आणि १ पुरुष अशा एकूण ८ जणांकडून वेळोवेळी दोन लाख ५६ हजार रुपये घेतले.पैसे घेतल्यानंतर काही दिवसांनी आरोपी दिनेश भोर याने आयोजक आजारी असल्याने सहल रद्द झाली आहे, मी तुमचे पैसे परत करतो, असे सांगितले.

# आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या मध्यस्थीला यश

- गोकुळ विरोधातील १८ दिवसांचे शेतकरी आंदोलन स्थगित

**सोलापूर : (स. गांवकरी)**

सोमवारी शेतकऱ्यांच्या खात्यात ऊस बिल, जमा होणार आहे. 'गोकुळ' शुगर विरोधातील १८ दिवसांचे आंदोलन आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्या यशस्वी मध्यस्थीनंतर स्थगित करण्यात आले आहे. येत्या सोमवारपर्यंत शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा केले जाणार आहेत. सोलापूरमधील धोत्री येथील गोकुळ शुगर कारखान्याच्या थकीत ऊस बिलासाठी सुरू असलेले १८ दिवसांचे शेतकरी आंदोलन आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांच्या मध्यस्थीनंतर १६ जूनपर्यंत २८०० रुपये प्रति टन जमा करण्याच्या आश्वासनावर स्थगित झाले आहे. सोमवारी शेतकऱ्यांच्या खात्यात ऊस बिल, जमा होणार आहे. धोत्री येथील गोकुळ शुगर कारखान्याकडून थकीत ऊस बिलाची रक्कम मिळावी, या प्रमुख मागणीसाठी गेल्या १८ दिवसांपासून जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर पूनम गेट येथे सुरू असलेले शेतकऱ्यांचे आंदोलन अखेर गुरुवारी (दि. ११ जून) तात्पुरते स्थगित करण्यात आले आहे. आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या मध्यस्थीनंतर येत्या १६ जूनपर्यंत शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर प्रति टन २,८०० रुपये दराने थकीत ऊस बिल जमा केले जाईल, असे आश्वासन देण्यात आल्याने आंदोलकांनी आंदोलन मागे घेण्याचा निर्णय घेतला आहे. 'गोकुळ थकीत ऊस बिल शेतकरी संघर्ष समिती'च्या वतीने सुरू असलेल्या या आंदोलनाने मागील काही दिवसांत तीव्र स्वरूप धारण केले होते. ४ जून रोजी शेकडो शेतकऱ्यांनी सोलापूर येथील साखर आयुक्त कार्यालयावर अर्धनग्न आंदोलन केले होते. त्यानंतर १० जून रोजी कंबर तलाव येथे दीड ते दोन हजार शेतकऱ्यांनी जलसमाधी आंदोलन करून प्रशासनाचे लक्ष वेधले होते. आंदोलनाची वाढती तीव्रता लक्षात घेऊन आमदार सचिन कल्याणशेट्टी, जिल्हाधिकारी, प्रांत अधिकारी तसेच दक्षिण सोलापूरचे तहसीलदार किरण जमदाडे यांच्या उपस्थितीत शेतकरी संघर्ष समितीच्या प्रतिनिधींसोबत महत्त्वपूर्ण बैठक घेण्यात आली.

# आईस्क्रीममधून विष देत वडिलांनी संपविले कुटुंब

- २ चिमुकल्यांसह पत्नीचाही जागीच मृत्यू
- मुख्याध्यापकांच्या कृत्याने सोलापूर जिल्हा हादरला



**सोलापूर : (स. गांवकरी)**

वडिलांचा प्लान न मुलांना माहिती नव्हता ना पत्नीला. त्यांनी सगळ्यांना संपविण्याचा विचार करूनच आइस्क्रीम खायला आणले होते याच आइस्क्रीम मधून त्यांनी चौघांचा जीव घेतला.

वडिलांनी आणलेले आईस्क्रीम सगळ्यांनी आनंदाने खाल्ले अन् 2 चिमुकल्यांसह पत्नीचाही जागीच मृत्यू, यानंतर त्याने स्वतः ही आत्महत्या केली. मुख्याध्यापकाने केलेल्या या कृत्याने संपुर्ण सोलापूर जिल्हा हादरून गेला आहे.

वडिलांनी आणलेलं आईस्क्रीम दोन चिमुकल्यांनी आणि पत्नीने आनंदाने खाल्लं. मात्र, या प्रत्येक गोड घासात मृत्यू लपलाय, याची त्यांना कल्पनाही नव्हती. काही वेळातच पत्नीसह दोन्ही लेकरांचा मृत्यू झाला.

शाळेला सुट्ट्या लागल्यामुळे नंदुरबारहून एक मुख्याध्यापक आपल्या पत्नी आणि दोन निष्पाप चिमुरड्यांना घेऊन सोलापुरातल्या मूळ गावी आले होते. सगळं काही आनंदाने सुरू होतं... वडिलांनी आणलेलं आईस्क्रीम दोन चिमुकल्यांनी आणि पत्नीने आनंदाने खाल्लं. मात्र, या प्रत्येक गोड घासात मृत्यू लपलाय, याची त्यांना कल्पनाही नव्हती. काही वेळातच पत्नीसह दोन्ही लेकरांचा मृत्यू झाला. या तिघांचीही हत्या केल्यानंतर मुख्याध्यापकाने स्वतःही आत्महत्येचं टोकाचं पाऊल उचलले.

दोन लहान मुले आणि पत्नीचा जीव घेऊन, त्या मुख्याध्यापकाने स्वतःही गळफास लावून आयुष्य संपवले आहे. या सामूहिक हत्याकांडात एका रात्रीत अख्खं कुटुंबं संपलं असून, यामागचे जे धक्कादायक कारण समोर आले आहे, ते ऐकून तुमचेही डोळे पांढरे होतील. समोर आलेल्या प्राथमिक माहितीनुसार, मृत शिक्षक हे बार्शी तालुक्यातील असून ते नौकरी साठी. नंदुरबार जिल्ह्यातील तळोदा तालुक्यात एका प्राथमिक शाळेत मुख्याध्यापक म्हणून कार्यरत होते. उन्हाळ्याच्या सुट्ट्या घालवण्यासाठी ते आपल्या हत्तीद (ता. बार्शी) या मूळ गावी कुटुंबासह आले होते. प्राथमिक तपासात समोर आलेल्या संशयानुसार, या मुख्याध्यापकाने आपल्या पत्नीला आणि दोन निष्पाप चिमुरड्यांना आईस्क्रीममधून अत्यंत जहाल विष दिले. आइस्क्रीम मधून विष प्राशन केल्यानंतर काही वेळातच तडफडून तिघांचाही मृत्यू झाला. कुटुंबातील सर्वांचा श्वास थांबल्याची खात्री पटताच, या शिक्षकाने स्वतःही घरात गळफास घेऊन आपली जीवनयात्रा संपवली.

एका प्रतिष्ठीत मुख्याध्यापकाने आपल्याच पोटच्या पोरांना आणि पत्नीला संपवण्याचं एवढं टोकाचं पाऊल का उचललं? या प्रश्नाचा शोध घेताना पोलिसांच्या हाती अत्यंत धक्कादायक माहिती लागली आहे. पोलिसांच्या प्राथमिक तपासात समोर आले आहे की, या शिक्षकाला 'शेअर मार्केट' आणि ऑनलाईन ट्रेडिंगमध्ये प्रचंड नाद लागला होता. या नादात त्यांना तब्बल १ कोटी रुपयांपेक्षा जास्त आर्थिक फटका बसला होता. याच भयंकर आर्थिक संकटातून आणि असह्य मानसिक तणावातून त्यांनी अख्खं कुटुंब संपवलं असल्याचा अंदाज वर्तवला जात आहे. घटनेची माहिती मिळताच बार्शी पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत घराची झाडाझडती घेतली. पोलिसांनी चौघांचेही मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पाठवले आहेत. आईस्क्रीमचे नमुने आणि घरातील इतर संशयास्पद वस्तू न्यायवैद्यक प्रयोगशाळेकडे पाठवण्यात आल्या आहेत.

# प्रामाणिक अधिकाऱ्यांच्या पाठीशी उभे राहूया - समाज परिवर्तनासाठी एकत्र येऊया!

## शिवानंद चौगुले यांचे आवाहन

**अक्कलकोट : (स. गांवकरी)**

आज आपल्या समाजासमोर अनेक गंभीर आव्हाने उभी आहेत. भेसळयुक्त अन्नपदार्थ, बनावट औषधे, अवैध दारू विक्री, गुटखा, मटका, जुगार आणि इतर बेकायदेशीर व्यवसायांमुळे समाजाचे नैतिक, आर्थिक आणि आरोग्यदृष्ट्या मोठे नुकसान होत आहे. अशा परिस्थितीत जनहितासाठी कठोर पावले उचलणारे आणि कोणत्याही दबावाला न जुमानता कार्य करणारे अधिकारी समाजासाठी आशेचा किरण ठरतात. अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त मा. तुकाराम मुंडे यांनी भेसळविरोधी आणि जनहिताच्या मोहिमेला दिलेली गती ही निश्चितच कौतुकास्पद आहे. नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या भेसळखोरांविरोधात त्यांनी उघडलेली मोहीम ही केवळ प्रशासकीय कारवाई नसून समाजाच्या सुरक्षित भवितव्यासाठी सुरू असलेला एक संघर्ष आहे. अशा अधिकाऱ्यांना धमक्या मिळणे ही अत्यंत दुर्दैवी बाब असून याचा सर्व स्तरांतून निषेध होणे आवश्यक आहे. धोत्री (ता. दक्षिण सोलापूर) येथील तमाम ग्रामस्थ, व्यापारी बंधू, युवक, सामाजिक कार्यकर्ते, ग्रामपंचायत पदाधिकारी आणि सर्व नागरिकांना आम्ही हात जोडून नम्र आवाहन करतो की, मा. तुकाराम मुंडे यांच्या जनहिताच्या अभियानात आपण एक सजग नागरिक म्हणून सहभागी व्हावे. समाजाला घातक ठरणारे अवैध धंदे, दारू विक्री, गुटखा, मटका, भेसळयुक्त पदार्थांचा व्यापार आणि इतर अनैतिक व्यवसाय स्वतःहून बंद करून सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडवावे. विशेषतः व्यापारी बंधूंनी समाजाप्रती असलेली जबाबदारी ओळखणे आवश्यक आहे. व्यापार हा केवळ नफा कमावण्याचे साधन नसून समाजसेवेचे माध्यम देखील आहे. आपल्या व्यवसायामुळे समाजातील युवक, महिला आणि भावी पिढीचे आरोग्य व भविष्य धोक्यात येणार नाही याची काळजी घेणे ही प्रत्येक व्यापाऱ्याची नैतिक जबाबदारी आहे. तसेच नागरिकांनीही स्वतःमध्ये परिवर्तन घडवून आणणे गरजेचे आहे. व्यसनाधीनता, गुटखा, दारू, जुगार यांसारख्या वाईट सवयींना स्वतःहून दूर केले पाहिजे. कारण समाजातील प्रत्येक वाईट व्यवसायाला ग्राहक मिळतो म्हणून तो टिकून राहतो. मागणी संपली तर पुरवठाही आपोआप थांबेल. म्हणून समाज परिवर्तनाची सुरुवात स्वतःपासून करणे ही काळाची गरज आहे. आज आपण आपल्या मुलांना चांगले संस्कार, उत्तम शिक्षण आणि उज्वल भविष्य देण्याची अपेक्षा करतो. परंतु त्यासाठी आपण स्वतः आदर्श नागरिक बनणे आवश्यक आहे. आदर्श पिढी घडवायची असेल तर आदर्श विचार, आदर्श कृती आणि आदर्श आचरण यांचा स्वीकार करावा लागेल. गावाचा विकास केवळ रस्ते, इमारती किंवा सुविधा उभारून होत नाही; तर सुसंस्कृत, व्यसनमुक्त आणि नैतिक मूल्ये जपणाऱ्या नागरिकांमुळे खरा विकास घडतो. धोत्री गावातील सर्व ग्रामस्थ, व्यापारी बंधू आणि युवकांना पुन्हा एकदा नम्र आवाहन आहे की, या समाजहिताच्या अभियानात सक्रिय सहभाग नोंदवा. आपण सर्वांनी एकत्रितपणे पुढाकार घेतला तर अवैध व्यवसाय, भेसळ, व्यसनाधीनता आणि सामाजिक विकृती यांना आळा घालणे अशक्य नाही. स्वयंस्फूर्तीने बदल स्वीकारला तर कायदेशीर कारवाईची वेळ येणार नाही. परंतु समाजहिताच्या दृष्टीने आवश्यक असेल तर प्रशासनाला कठोर निर्णय घ्यावे लागतील, हेही लक्षात घेतले पाहिजे.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ३८ए, सोमश्वर अपार्टमेंट, अदाते/शिंदे हॉस्पिटलजवळ, पुरूषोत्तम व्हिला समोर, वडगांव बुद्रुक, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# रण बिन्नर यांचे जात प्रमाणपत्र बनावट असल्याने नगरसेवक पद रद्द होण्याची शक्यता

## मुख्याधिकारी किशोर चव्हाण यांच्याकडे शासकीय अहवाल सादर झाल्याने शहरात राजकीय वर्तुळात एकच खळबळ

इगतपुरी : (स. गांवकरी)

इगतपुरी तहसील कार्यालयात गेल्या अनेक वर्षापासुन दलालांमार्फत अनेक प्रकारचे बनावट दाखले काढले जातात. या बनावट दाखल्यांमुळे काही युवकांच्या शासकीय नोकरीत अडचणी निर्माण झाल्या तर अनेकांचे शिक्षण आणि राजकीय क्षेत्रात भुकंप आला आहे. अनेक दाखले बोगस असल्याने या बाबत कथित दलालांवर पोलीस कारवाईही झाली. तर काही दलालांना राजकीय वरदहस्त असल्याने अनेकांनी या प्रकरणातुन काढता पाय घेतला. अनेक दलाल व खाजगी सेतु संचालकांवर बोगस दाखले दिल्या बाबत न्यायालयात खटले सुरू असतांनाच इगतपुरी शहरात बनावट जातप्रमाणपत्र प्रकरण पुन्हा उघड झाले आहे. नुकत्याच झालेल्या नगरपरिषदेच्या



निवडणुकीत तळेगाव प्रभाग क्र. १० मध्ये ओबीसी गटातुन भाजपा पक्षाच्या उमेदवारीने निवडुन आलेले किरण लक्ष्मण बिन्नर यांचे जात प्रमाणपत्र बोगस असल्याचे माहितीच्या अधिकारात निष्पन्न झाले आहे. त्यामुळे बिन्नर यांचे नगरसेवक पद धोक्यात आले आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की इगतपुरी नगरपरिषदेतील भाजपचे विद्यमान नगरसेवक किरण लक्ष्मण बिन्नर यांच्या जातप्रमाणपत्राबाबत धक्कादायक माहिती समोर आली आहे. जातपडताळणी समितीने संबंधित प्रमाणपत्र बनावट असल्याचा निष्कर्ष नोंदविल्याने इगतपुरीच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. या निर्णयामुळे त्यांच्या नगरसेवकपदावर गदा येण्याची शक्यता निर्माण झाली असून नगरसेवक पद रद्द करण्याची प्रक्रिया सुरू झाल्याची माहिती आहे. दि. ११ रोजी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांना किरण बिन्नर यांच्या बोगस प्रमाणपत्राबाबत शासकीय अहवाल प्राप्त झाला असल्याची माहिती मुख्याधिकारी किशोर चव्हाण यांनी दिली. किरण बिन्नर यांनी संबंधीत जातप्रमाणपत्र सन २०१८ मध्ये काढण्यात आल्याचा दावा करण्यात

> विद्यमान नगरसेवक किरण बिन्नर यांचे जात प्रमाणपत्र बोगस असल्याचे महसुल, जात पडताळणी, आणि माहिती अधिकारात स्पष्ट केल्याची माहिती दि. ११ रोजी नगरपरिषद कार्यालयात प्राप्त झाली आहे. या प्रक्रीयेत शासन स्तरावर निर्णय घेतला जाईल.
>
> **- किशोर चव्हाण, मुख्याधिकारी, इगतपुरी नगरपरिषद**

आला होता. मात्र चौकशीदरम्यान या प्रमाणपत्राची कोणतीही अधिकृत नोंद शासकीय अभिलेखांमध्ये आढळून आली नाही. याशिवाय ज्या 'आपले सरकार सेवा केंद्रातून प्रमाणपत्र प्राप्त झाल्याचे सांगण्यात आले होते, असे केंद्रच इगतपुरी तालुक्यात अस्तित्वातच नसल्याचे तपासात स्पष्ट झाले आहे. इगतपुरी नगरपरिषद निवडणुकीसाठी सादर करण्यात आलेल्या नामनिर्देशन अर्जातील कागदपत्रांची माहिती अधिकारातून छाननी केल्यानंतर हे प्रकरण उघडकीस आले.

बिन्नर यांचा दाखला बोगस असल्याची चर्चा शहरात सुरु असतांनाच शहरातील सामाजिक कार्यकर्ते शोभराज शर्मा व ज्ञानेश्वर पासलकर यांनी नगरसेवक बिन्नर यांचे संबंधित कागदपत्रे मिळवून सातत्याने पाठपुरावा केला होता. माहितीच्या अधिकारात संपुर्ण प्रमाणपत्राची मागणी करत शासनाकडे पाठपुरावा केला होता. त्यानंतर महसूल प्रशासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घेत सखोल चौकशी सुरू केली. महसुल विभागात या प्रकरणाची चौकशी

> शासकीय जातपडताळणी समितीने संबंधित जातप्रमाणपत्र बनावट असल्याचा आदेश दिल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी तातडीने कारवाई करून संबंधित नगरसेवकाचे पद रद्द करावे असा आदेश नगरपरिषद विभागाला पाठविला आहे. कायद्याचे राज्य टिकविण्यासाठी ही कारवाई होणे आवश्यक आहे.
>
> **- ज्ञानेश्वर पासलकर, माहिती अधिकार कार्यकर्ता**

> जातपडताळणी समितीने दिलेल्या आदेशात संबंधित जातप्रमाणपत्र बोगस व बनावट असल्याने ही शासनाची व जनतेची फसवणुक आहे. लोकशाही प्रक्रियेत बनावट कागदपत्रांच्या आधारे निवडून येणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. दोषीवर कठोर आणि तातडीची कारवाई झाली पाहिजे.
>
> **- शोभराज शर्मा, तक्रारदार, इगतपुरी**

तलाठी, मंडळ अधिकारी तसेच दक्षता पथक (पोलिस) यांच्या माध्यमातून दोन वेळा करण्यात आली. उपलब्ध अभिलेख, नोंदी आणि पुराव्यांची बारकाईने तपासणी करण्यात आली. त्यानंतर इगतपुरी तहसीलदार कार्यालयाने सविस्तर अहवाल वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे सादर केला. प्रांत कार्यालयानेही कायदेशीर चौकटीत राहून वस्तुनिष्ठ पद्धतीने पडताळणी करून तपासी अहवाल पुढे पाठवले.

# थोडक्यात पण महत्वाचे

### तामसा येथे अपर तहसीलदार कार्यालयाचा प्रस्ताव

तामसा (स. गांवकरी) : महसूल विभागाच्या पुनर्रचना प्रक्रियेअंतर्गत हदगाव तालुक्यातील तामसा येथे स्वतंत्र अपर तहसीलदार कार्यालय स्थापन करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. महसूल व वन विभागाने यासंदर्भात जाहीर सूचना प्रसिद्ध करून नागरिकांकडून हरकती व सूचना मागविण्याचे निर्देश दिनांक 11 जून रोजीच्या पत्रान्वये संबंधितांना देण्यात आले आहेत. प्रस्तावानुसार तामसा, आष्टी आणि मनाठा ही महसूल मंडळे प्रस्तावित तामसा अपर तहसीलदार कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात समाविष्ट करण्यात येणार आहेत. तर हदगाव तहसील कार्यालयाकडे हदगाव, निवघा, तळणी, बरडशेवाळा आणि पिंपरखेड ही महसूल मंडळे कायम राहणार आहेत. नागरिकांकडून प्राप्त होणाऱ्या हरकती व सूचनांचा विचार करून शासन अंतिम निर्णय घेणार आहे. तामसा येथे अपर तहसीलदार कार्यालय स्थापन झाल्यास परिसरातील नागरिकांना महसूलविषयक सेवा अधिक सुलभ व जलद उपलब्ध होण्यास मदत होणार असल्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### एलसी व गुणपत्रिकेसाठी विद्यार्थ्यांकडून पैसे वसुली?

तामसा (स. गांवकरी) : राज्याच्या शिक्षण विभागाने एलसी (शाळा सोडल्याचा दाखला) व गुणपत्रिका देण्यासाठी विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारणे बेकायदेशीर असल्याचे स्पष्ट करत अशा शाळांवर कठोर कारवाईचे आदेश दिले असतानाही तामसा येथील काही शाळांमध्ये विद्यार्थ्यांकडून पैसे वसूल केल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. दहावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी एलसी व गुणपत्रिकेची आवश्यकता असते. मात्र तामसा येथील एका शाळेत विद्यार्थ्यांना "प्रथम १०० रुपये भरा, त्यानंतरच गुणपत्रिका व एलसी मिळेल" असे सांगण्यात आल्याची चर्चा विद्यार्थी व पालकांमध्ये सुरू आहे. अनेक विद्यार्थ्यांची आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याने काहींना उसनवारी करून पैसे जमा करावे लागल्याचेही समोर आले आहे. एका दैनिकात प्रसिद्ध झालेल्या वृत्तानुसार, शिक्षण संचालकांनी राज्यातील सर्व शिक्षणाधिकाऱ्यांना स्पष्ट निर्देश देत एलसी व गुणपत्रिकेसाठी कोणत्याही प्रकारची रक्कम घेणाऱ्या शाळांवर तात्काळ कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच विद्यार्थ्यांकडून वसूल केलेली रक्कम परत करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. तामसा परिसरातील विद्यार्थी व पालकांनी संबंधित प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी केली आहे. शिक्षण हा मूलभूत अधिकार असून एलसी व गुणपत्रिका यांसारखी आवश्यक कागदपत्रे देण्यासाठी विद्यार्थ्यांची आर्थिक पिळवणूक होणे दुर्दैवी असल्याची भावना पालकांनी व्यक्त केली आहे.

### निलंबित कृषी केंद्रांमध्ये खताची पोती; वाटप करण्याची मागणी

तामसा (स. गांवकरी) : नायगाव तालुक्यातील खरीप हंगामाच्या तोंडावर खतांची मागणी दिवसेंदिवस वाढत असताना, निलंबित करण्यात आलेल्या कृषी सेवा केंद्रांमध्ये सुमारे १५ हजार खतांची पोती पडून असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे ही खतसाठा तात्काळ शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्याची मागणी शेतकरी संघटना व विविध स्तरातून जोर धरू लागली आहे. कृषी विभागाने अनियमितता आढळून आल्याने तालुक्यातील काही कृषी सेवा केंद्रांचे परवाने निलंबित केले आहेत. मात्र या केंद्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर रासायनिक खतांचा साठा शिल्लक असल्याचे सांगितले जात आहे. खरीप हंगामासाठी शेतकरी बियाणे, खत आणि औषधांची जुळवाजुळव करण्यात व्यस्त असताना दुसरीकडे खतासाठी त्यांना भटकंती करावी लागत आहे. अशा परिस्थितीत उपलब्ध असलेला खतसाठा उपयोगात आणणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त होत आहे. शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, अनेक भागांत खतांचा तुटवडा जाणवत असून काही ठिकाणी आवश्यक त्या प्रमाणात खत उपलब्ध होत नाही. परिणामी पेरणीपूर्व तयारीवर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. निलंबित केंद्रांमधील खतसाठा प्रशासनाने जप्त करून तो अधिकृत यंत्रणेमार्फत शेतकऱ्यांना वितरित केल्यास मोठा दिलासा मिळू शकतो. दरम्यान, संबंधित कृषी सेवा केंद्रांमध्ये नेमका किती खतसाठा उपलब्ध आहे, त्याची गुणवत्ता व वितरणाबाबत कोणती प्रक्रिया राबविण्यात येणार, याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. कृषी विभागाने या प्रकरणी तातडीने निर्णय घेऊन खताचा साठा वाया जाणार नाही, याची दक्षता घ्यावी, अशी मागणी पुढे येत आहे.

### पीएलएफएस व एएसयुएसई राष्ट्रीय सर्वेक्षणाचा शुभारंभ

नांदेड (स. गांवकरी) : सांख्यिकी आणि कार्यक्रम कार्यान्वयन मंत्रालय (MoSPI), भारत सरकार यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच जागतिक बँकेच्या सहाय्याने महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागामार्फत MahaSTRIDE प्रकल्पांतर्गत राज्यात जून २०२६ ते मार्च २०२७ या कालावधीत नियतकालिक श्रमशक्ती सर्वेक्षण (PLFS) आणि असंघटित क्षेत्रातील उद्योगांचे वार्षिक सर्वेक्षण (ASUSE) राबविण्यात येणार आहे. या सर्वेक्षणांच्या कामाचा शुभारंभ आज जिल्हाधिकारी कार्यालयात अपर जिल्हाधिकारी डॉ. रत्नदीप गायकवाड यांच्या हस्ते माहितीपत्रकाचे विमोचन करून करण्यात आला. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, सांख्यिकी अधिकारी श्रीमती प्रज्ञा पांढरे तसेच अन्वेषक आणि पर्यवेक्षक उपस्थित होते. केंद्र शासनाच्या धर्तीवर अर्थ व सांख्यिकी आयुक्तालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन या सर्वेक्षणात सहभागी होत आहे. या सर्वेक्षणातून मिळणारी आकडेवारी शासनाच्या विविध योजना आणि धोरणे तयार करण्यासाठी महत्त्वाची ठरणार आहे.

# सापुतारा–मालेगाव घाटमार्गावर आयशर टेम्पोचा अपघात



डांग, गुजरात : (स. गांवकरी)

डांग जिल्ह्यातील सापुतारा–मालेगाव घाटमार्गावर आज एक गंभीर अपघात घडला. मिळालेल्या माहितीनुसार, महाराष्ट्रातील नाशिक येथून मालाचा साठा घेऊन सुरतकडे जाणारा आयशर टेम्पो (क्र. GJ-12-BV-7400) सापुतारा–शामगहान आंतरराज्य महामार्गावरील मालेगाव फॉरेस्ट रेस्ट हाऊसजवळील वळणावर पोहोचला असता चालकाचे वाहनावरील नियंत्रण अचानक सुटले. नियंत्रण सुटल्यामुळे टेम्पो रस्त्याच्या कडेला असलेल्या संरक्षण भिंतीवर जोरात आदळला. या धडकेत टेम्पोचे मोठे नुकसान झाले असून अपघात अत्यंत गंभीर स्वरूपाचा होता. मात्र, सुदैवाने या अपघातात चालकाचा चमत्कारिक बचाव झाला असून कोणतीही जीवितहानी झाल्याची माहिती समोर आलेली नाही. अपघातानंतर परिसरात काही काळ वाहतुकीवर परिणाम झाला होता. संबंधित यंत्रणांनी घटनास्थळी पोहोचून पुढील कार्यवाही सुरू केली आहे.

# अनेक अतिक्रमणे जेसीबी सहायाने काढली

नवीन नांदेड : (स. गांवकरी)

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्या वतीने सिडको लगत असलेल्या एम आय.डी. सि मधील रस्त्या लगत केलेली पानटपरी, हॉटेल,व ईतर व्यवसाय साठी केलेली अनेकांनी केलेले अतिक्रमण एक दिवशीय मोहीमेत सर्वात जास्त असेलेली प्रादेशिक परिवहन कार्यालय आरटीओ समोरील व विविध भागातील अतिक्रमणे 12 जुनं रोजी जेसीबीच्या सहायाने काढण्यात आली यावेळी ग्रामीण पोलीस स्टेशन पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्या बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

सिडको परिसरा लगत असलेल्या औद्योगिक वसाहत कार्यालय यांच्या वतीने परिसरात रस्त्या लगत असलेले अतिक्रमण हटाव मोहिम 12 जुनं दरम्यान प्रादेशिक अधिकारी राजाराम गुठले, ऊपरचनाकार चव्हाण, कार्यकारी अभियंता जावेद,क्षेत्रीय व्यवस्थापक गजानन कपाळे, सौ.सुरेखा फड,



श्रीकांत तमखाने,संदीप देशमुख यांच्या सह कर्मचाऱ्यांच्या उपस्थित औद्योगिक वसाहतीतील प्रादेशिक परिवहन कार्यालय समोरील पानटपरी, हाँटेल,व जागेवर केलेले जवळपास अनेक अतिक्रमण जेसीबी सहायाने काढून टाकण्यात आले, यावेळी संबंधित अतिक्रमण धारक , अधिकारी कर्मचारी व पोलीस यांच्या सोबत काही वेळ वादविवाद झाला होता, आमच्या कुटुंबातील सदस्यांसाठी हा व्यवसाय उदर निर्वाह असल्याने आम्हाला वेळ द्या अशी मागणी काही जणांनी केली परंतु या बाबत जवळपास पंधरा दिवसांपूर्वी तोंडी सूचना दिल्याचे सांगण्यात आले होते असे सांगून संबंधित अतिक्रमण धारकांची समजुत काढून पुन्हा मोहीम चालू ठेवली.

तर काही भागात छोट्या व्यवसायकांनी केलेले अतिक्रमण मोहीम येण्यापूर्वीच दुध डेअरी ते ऊस्मानगर रोडवरील गोपाळ चावडी कमान दरम्यान अतिक्रमण धारकांनी स्वाताहुन पानटपरी हाँटेल व केलेले अतिक्रमण काढून घेतले आहे. मोहीमे दरम्यान ग्रामीण पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक ज्ञानेश्वर मठवाड, भालेराव यांच्या सह महिला पोलिस,पोलीस कर्मचारी यांच्या कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता,या तिनं दिवसीय मोहीम मुळे औद्योगिक वसाहतीतील मुख्य मार्गावरील व अंतर्गत रोडवरील अतिक्रमणे काढण्यात आली आहेत, यामुळे संबंधित भुखंड धारक व अनेक व्यवसायीक धारकांना दिलासा मिळाला आहे.

# मानवी जिवितास घातक असणारे प्रतिबंधित ड्रग्ज इंजेक्शनचा साठा जप्त

## मिरजगाव पोलिसांची कारवाई : एकास अटक तर एकजण फरार ; बाभूळगाव खालसा शिवारातील घटना

कर्जत : (स. गांवकरी)

कर्जत तालुक्यातील बाभूळगाव खालसा येथील हायवे ब्रीजच्या खाली मानवी जिवीतास अपायकारक तसेच विक्रीसाठी प्रतिबंधीत असलेल्या बेकायदेशिर ड्रग्ज विकणाऱ्या एकास मिरजगाव पोलिसांनी अटक केली असून एक जण फरार आहे. या कारवाईत प्रतिबंधीत एकूण 77 ड्रग्जचे इंजेक्शन अंदाजे 58 हजार 640 रुपये किंमतीचा साठा जप्त करण्यात आला आहे. अहिल्यानगर जिल्हयाचे नव्याने आलेले पोलीस अधीक्षक सुदर्शन मुम्मका यांनी जिल्ह्यातील सर्व अवैध धंद्यावर कारवाया करणेबाबत दिलेल्या सुचनांचे व आदेशाचे अनुषंगाने दि.9/06/2025 रोजी मिरजगाव पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी व अंमलदार पेट्रोलिंग करत असताना पोलीसांना गोपनीय माहितीच्या आधारे माहिती समजली. असता, ही सदरची कारवाई मिरजगाव



पोलिसांकडून करण्यात आली. याबाबत पोलिस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, ईसम नामे पप्पु ऊर्फ प्रविण लाला भोसले, रा. बाभुळगाव खालसा, ता. कर्जत याने रोहन भाऊसाहेब लाढाणे, वय 22 वर्षे, रा. बाभुळगाव खालसा, ता. कर्जत, जि. अहिल्यानगर यास मेफेन्टरमाइन सल्फेट इंजेक्शन आयपी (MEPHENTERMINE SULPHATE INJECTION IP) या नावाचे ड्रग्जचे इंजेक्शन बेकायदेशिररित्या विक्रीसाठी बाभुळगाव खालसा, ता. कर्जत येथील हायवे ब्रिजच्या खाली पाठविलेले असुन, सदरचे ड्रग्ज इंजेक्शन हे मानवी जिवितास धोकादायक व हानीकारक असुन, डॉक्टरांचे प्रिस्क्रिप्शन शिवाय विक्रीस बंदी असलेले आहे. तसेच सदर इंजेक्शनचा तरुणाईकडून नशा करण्यासाठी तसेच जिममध्ये व्यायाम करताना स्टॅमिना वाढविण्यासाठी उपयोग केला जातो. अशी बातमी समजल्याने बाभुळगाव खालसा, ता. कर्जत येथील हायवे ब्रिजखाली येऊन थांबलेला ईसम रोहन भाऊसाहेब लाढाणे याची पोलीसांनी झडती घेतली असता त्याचेकडे पोलीसांना मेफेन्टरमाइन सल्फेट इंजेक्शन आयपी हे इंजेक्शन मिळुन आले. असताना त्याला अटक करण्यात आली. त्यानंतर त्यास विक्री करण्यासाठी इंजेक्शन पुरविणारा मुख्य आरोपी पप्पु ऊर्फ प्रविण लाला भोसले याचे घराचे परीसराची पोलीसांनी झडती घेतली असता, मेफेन्टरमाइन सल्फेट इंजेक्शन आयपी या नावाचे 77 ड्रग्जचे इंजेक्शन असे एकुण 58 हजार 640/- रुपये किंमतीचे 77 ड्रग्जचे इंजेक्शन मिळुन आल्याने ते जप्त करुन ताब्यात घेतले.

पोलिस कॉन्स्टेबल सुनिल दिलीप खैरे यांच्या फिर्यादीवरून ईसम नामे- 1) रोहन भाऊसाहेब लाढाणे, वय- 22 वर्षे, व 2) प्रविण उर्फ पप्पू लाला भोसले, दोन्ही रा. बाभूळगाव खालसा, ता. कर्जत, जि. अहिल्यानगर (फरार) यांचेविरुद्ध भारतीय न्याय संहिता सन.2023 चे कलम 123, 125, 278 सह औषधीद्रव्य व सौंदर्य प्रसाधन अधिनियम 1940 चे कलम 18(c), 27 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# भैताणे दिगर येथे विशेष ग्रामसभा; निसर्ग संवर्धनाचा दिला संदेश

कळवण : (स. गांवकरी)

कळवण तालुक्यात जागतिक पर्यावरण दिनानिमित्त कळवण तालुक्यातील शेरी-भैताणे दिगर ग्रुप ग्रामपंचायतीत विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले. यावेळी पर्यावरण संवर्धनाचा संकल्प करत ग्रामस्थांनी गावठाणातील उपलब्ध जागेवर वृक्षारोपण व वनराई उभारणीचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या "एक पेड माँ के नाम" या अभियानातून प्रेरणा घेत ग्रामसभेत उपस्थित नागरिकांनी श्रमदानाच्या माध्यमातून गाव परिसर हिरवागार करण्याचा निर्धार व्यक्त केला. या उपक्रमात गावातील युवक, महिला मंडळ तसेच ज्येष्ठ नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. आदिवासी समाजाचा निसर्गाशी अतूट संबंध असून पिढ्यानपिढ्या निसर्गाचे जतन व संवर्धन करण्याची परंपरा त्यांनी जपली आहे. त्याच परंपरेचा वारसा



पुढे नेत गावातील नागरिकांनी पर्यावरण संरक्षणासाठी एकत्र येण्याचा संदेश दिला. ग्रामसभेत वृक्षसंवर्धन, जलसंधारण, स्वच्छता आणि जैवविविधतेचे महत्त्व यावरही चर्चा करण्यात आली.

भविष्यात गाव परिसरात मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करून त्यांचे संगोपन करण्याचा निर्धार ग्रामस्थांनी व्यक्त केला. या उपक्रमामुळे पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती होण्यास मदत होणार असून शेरी-भैताणे दिगर ग्रामपंचायतीचा हा उपक्रम इतर गावांसाठीही प्रेरणादायी ठरणार असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

# ‘अब होगा हिसाब’ ही सूडकथेवर आधारित सीरिज १८ जूनपासून

मुंबई : (स. गांवकरी)

भारतातील आघाडीची मोफत, प्रीमियम आणि जाहिरात-आधारित व्हिडिओ स्ट्रीमिंग सेवा असलेल्या ॲमेझॉन एमएक्स प्लेअरने आपल्या बहुप्रतीक्षित ‘अब होगा हिसाब’ या ओरिजिनल सूडकथेवर आधारित सारिजचा ट्रेलर प्रदर्शित केला आहे. पंजाबच्या पार्श्वभूमीवर घडणारी ही सीरिज बॉबी आणि बंटी मनोचा या दोन भावांच्या आयुष्याभोवती फिरते. एका घटनेमुळे त्यांच्या आयुष्यात आमूलाग्र बदल घडतो. “आपल्या माणसांसाठी तुम्ही कोणती पातळी गाठू शकता?” हा या सीरिजमधील मध्यवर्ती प्रश्न आहे. आरे स्टुडिओची निर्मिती असलेल्या या सीरिजमध्ये संजय कपूर आणि शाहीर यांच्या प्रमुख भूमिका आहेत. त्यांच्यासोबत मौनी रॉय, अविनाश मिश्रा, निमृत कौर अहलुवालिया, हरमन सिंघा आणि आशीमा वर्दान हे कलाकार महत्त्वाच्या भूमिकांमध्ये झळकणार आहेत. ‘अब होगा हिसाब’ ही सीरिज 18 जूनपासून ॲमेझॉन एमएक्स प्लेअरवर मोफत स्ट्रीम होणार आहे. शाहीर आणि अविनाश मिश्रा यांनी साकारलेल्या बॉबी आणि बंटी मनोचा या दोन भावांची कथा ट्रेलरमध्ये पाहायला मिळते. आपल्या धाकट्या भावाला चांगले भविष्य मिळावे यासाठी बॉबी त्याला परदेशात पाठवण्याचे स्वप्न पाहत असतो. मात्र हे स्वप्न लवकरच भयानक वळण घेते. गूढरीत्या लोक बेपत्ता होण्याच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर, संजय कपूर यांनी साकारलेला प्रभावशाली गोल्डी बंटीला एक आकर्षक संधी देतो. त्यानंतर बंटी अचानक बेपत्ता होतो आणि अशा रहस्यमयरीत्या गायब होणाऱ्या लोकांच्या वाढत्या यादीत त्याचेही नाव समाविष्ट होते. संशय, फसवणूक आणि खोट्या




आरोपांच्या जाळ्यात अडकलेल्या बंटीला वाचवण्यासाठी बॉबीची धडपड सुरू होते आणि त्याच्यासाठी प्रत्येक क्षण महत्त्वाचा असतो. गुपिते उलगडत जातात आणि परिस्थिती अधिक गुंतागुंतीची होते. अशा वेळी आपल्या भावाला वाचवण्यासाठी आणि सत्य समोर आणण्यासाठी बॉबी किती मोठे धोके पत्करेल, हा प्रश्न सीरिजमध्ये उभा राहतो. ॲमेझॉन एमएक्स प्लेअरचे कंटेंट प्रमुख अमोघ दुसाद म्हणाले, “'अब होगा हिसाब' ही भावांमधील नाते, सूड आणि त्यामधील गुंतागुंतीच्या भावनांची प्रभावी कथा आहे. संजय कपूर, शाहीर, मौनी रॉय, अविनाश मिश्रा आणि इतर अनेक प्रतिभावान कलाकारांच्या दमदार अभिनयामुळे ही सीरिज अधिक प्रभावी झाली आहे. ॲमेझॉन एमएक्स प्लेअरमध्ये आम्ही भारताच्या मातीत रुजलेल्या आणि देशभरातील प्रेक्षकांशी जोडल्या जाणाऱ्या कथा मोफत स्वरूपात सादर करण्यासाठी कटिबद्ध आहोत. ‘अब होगा हिसाब’ ही त्याच वचनबद्धतेचे प्रतिबिंब आहे. वास्तवदर्शी कथनशैली आणि सर्वांना भावणाऱ्या विषयांची सांगड या सीरिजमध्ये घालण्यात आली आहे. या सारिजचा ट्रेलर सादर करताना आम्हाला आनंद होत असून, प्रेक्षकांनी या रोमांचक प्रवासाचा अनुभव घ्यावा, अशी आमची इच्छा आहे.” या सारिजकडे आकर्षित होण्यामागील कारण सांगताना गोल्डीची भूमिका साकारणारे संजय कपूर म्हणाले, “'अब होगा हिसाब'मधील व्यक्तिरेखांची खोली आणि त्याचे गुंतागुंतीचे कथाविश्व यामुळे मी या सीरिजकडे आकर्षित झालो. या सीरिजमधील मला सर्वाधिक भावलेली गोष्ट म्हणजे नाती आणि भावबंध यांचे अतिशय सुंदर चित्रण. ही कथा अनेक स्तरांनी समृद्ध, अनपेक्षित घडामोडींनी भरलेली आणि सतत नवे वळण घेणारी आहे. ॲमेझॉन एमएक्स प्लेअरसोबत पुन्हा एकदा काम करताना मला आनंद होत आहे. या सीरिजमध्ये दडलेले अनेक पैलू प्रेक्षकांना पाहायला मिळतील, याची मला उत्सुकता आहे.” बॉबी या आपल्या व्यक्तिरेखेबद्दल आणि कथेच्या भावनिक गाभ्याविषयी बोलताना शाहीर म्हणाला, “बॉबीच्या व्यक्तिरेखेकडे मला सुरुवातीपासून आकर्षित करणारी गोष्ट म्हणजे त्याची आपल्या प्रिय व्यक्तींप्रती, विशेषतः भावाप्रती असलेली अढळ निष्ठा. आपल्या कुटुंबाच्या रक्षणासाठी कोणत्याही थराला जाण्यास तो तयार असतो आणि हीच भावना मालिकेतील त्याच्या प्रत्येक निर्णयामागील प्रेरक शक्ती ठरते. हा प्रवास साकारताना मला खूप समाधान मिळाले.

# थोडक्यात पण महत्वाचे



## आदित्य सोनवणे वैद्यकीय परिक्षा उत्तीर्ण

रावेर (स. गांवकरी) : छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय आणि राजीव गांधीं शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथील फायनल ईयर MBBS च्या परीक्षेत डॉ.आदित्य रंजना मनोहर सोनवणे यांनी प्रथमश्रेणीत उत्तीर्ण करून उत्कृष्ट कामगिरी केली. विदर्भातील बुलढाण्या सारख्या दुर्गम भागात शिक्षण घेऊन आदित्य सोनवणे यांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय प्रवेश मिळवला.साडेचार वर्षाचा MBBS अभ्यासक्रम पूर्ण करून अंतिम परीक्षेत प्रथमश्रेणीत यश संपादन केले.या त्यांच्या यशात त्यांच्या परिवार आणि शिक्षक मार्गदर्शक यांचा मोलाचा वाटा आहे असे त्यांनी सांगितले. यावेळी गांवकरीचे तालुका प्रतिनिधी चंद्रकांत कोळी, सौ सुमित्रा कोळी , यांच्यासह अनेक हजर होते.

## बुलेट ट्रेनच्या कामामुळे बंद झालेला पाण्याचा नैसर्गिक प्रवाह पुन्हा सुरू



ठाणे (स. गांवकरी) : बेतवडे गाव येथील साईनगरी चाळीसमोर सुरू असलेल्या बुलेट ट्रेन (NHSRCL) प्रकल्पाच्या कामादरम्यान करण्यात आलेल्या अतिरिक्त भरावामुळे पावसाचे पाणी वाहून नेणारे नैसर्गिक प्रवाह बंद झाले होते. त्यामुळे मुसळधार पावसाच्या काळात साईनगरी परिसरात मोठ्या प्रमाणात पाणी साचण्याची तसेच तेथील नागरिकांच्या घरांमध्ये पाणी घुसण्याची शक्यता निर्माण झाली होती. या संभाव्य समस्येची गंभीर दखल घेत माजी उपमहापौर तथा दिवा शहर प्रमुख रमाकांत मढवी आणि स्थानिक नगरसेवकांनी यापूर्वीच दिवा प्रभाग समिती तसेच बुलेट ट्रेन प्रशासनाकडे याबाबत पाठपुरावा केला होता. नागरिकांना भविष्यात होणारा त्रास टाळण्यासाठी संबंधित यंत्रणांचे लक्ष वेधण्यात आले होते. या पाठपुराव्याला अखेर यश आले असून आज दुपारी पावसाच्या पाण्याचा निचरा सुरळीत होण्यासाठी आवश्यक नाला टाकण्याचे काम पूर्ण करण्यात आले. त्यामुळे साईनगरी परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. यावेळी दिवा प्रभाग समितीच्या बांधकाम विभागाचे आदित्य डावखरे, बुलेट ट्रेन (NHSRCL) चे सतीश कुलकर्णी, एल अँड टी कंपनीचे हेड ऑफिसर सुमित पंडित, तरुण चक्रवर्ती, शिवसेना उपविभाग प्रमुख सदाशिव पाटील, शाखाप्रमुख राजेश पाटील, रोशन भोईर तसेच साईनगरी परिसरातील रहिवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्थानिक नागरिकांनी संबंधित यंत्रणांनी वेळेत उपाययोजना केल्याबद्दल समाधान व्यक्त केले असून आगामी पावसाळ्यात पाणी साचण्याच्या समस्येपासून दिलासा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

## आयसीसी महिला टी20 विश्वचषक 2026 साठी विशेष मोहिम




पुणे (स. गांवकरी) : ह्युंडाई मोटर इंडिया लि.(एचएमआयएल) तर्फे आयसीसी महिला टी20 विश्वचषक 2026 साठी नवीन ब्रँड मोहिम सादर करण्यात आली आहे.यामध्ये कंपनीचे ब्रँड ॲम्बेसिडर असलेल्या स्मृती मंधाना आणि जेमिमा रॉड्रिग्स यांचा या मोहिमेत समावेश आहे.महिला क्रिकेटपटूंची जिद्द,कौशल्य आणि वर्चस्व हे यानिमित्त सादर केलेल्या फिल्ममध्ये अधोरेखित केले आहे.

## भारतात एआय गुंतवणुकीला वेग



पुणे (स. गांवकरी) : भारतातील उद्योगक्षेत्र कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) तंत्रज्ञानाच्या प्रयोगात्मक टप्प्यातून बाहेर पडून प्रत्यक्ष व्यावसायिक अंमलबजावणीकडे वेगाने वाटचाल करत असल्याचे सॅपच्या व्हॅल्यू ऑफ एआय रिपोर्ट २०२६ मध्ये स्पष्ट झाले आहे. ऑक्सफर्ड इकॉनॉमिक्सच्या सहकार्याने तयार करण्यात आलेल्या या अहवालानुसार भारतीय संस्था एआयमध्ये सुमारे २५.९ दशलक्ष अमेरिकी डॉलर्सची गुंतवणूक करण्याच्या तयारीत असून पुढील दोन वर्षांत त्यात ४५ टक्क्यांहून अधिक वाढ होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. १३ देशांतील २,६०० व्यावसायिक नेत्यांच्या सहभागातून करण्यात आलेल्या या सर्वेक्षणात भारतातील २०० उद्योग प्रतिनिधींचा समावेश होता. अहवालानुसार, भारत हा एआयमध्ये संरचित पद्धतीने गुंतवणूक करणाऱ्या देशांमध्ये जगात दुसऱ्या क्रमांकावर आहे. भारतीय उद्योगांपैकी ७१ टक्के कंपन्यांकडे स्वतंत्र एआय धोरण असून सध्या ३३ टक्के कामकाजात एआयचा वापर होत आहे. पुढील दोन वर्षांत हा आकडा ५१ टक्क्यांपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे.

## आयडीबीआय इन्नोव्हेशन २०२६ या हॅकेथॉनचे आयोजन

मुंबई (स. गांवकरी) : आयडीबीआय बँके तर्फे आज त्यांच्या हॅकेथॉन "आयडीबीआय इन्नोव्हेट २०२६" या भविष्याभिमुख दृष्टिकोनाशी संबंधित अशा उपक्रमाची घोषणा केली असून या अंतर्गत बँकिंग पध्दतींमधील नाविन्य वाढून डिजिटल बदलांना चालना देण्यात येणार आहे. या उपक्रमाचे औपचारिक उद्घाटन आयडीबीआय बँकेचे एमडी आणि सीईओ श्री. राकेश शर्मा यांच्या हस्ते करण्यात आले, यामुळे आता पुढील पिढीतील तंत्रज्ञानाचा वापर बँकिंग क्षेत्रात आणण्याच्या त्यांच्या प्रयत्नांना चालना मिळेल. 'बिल्ड, इंटिग्रेट, ट्रान्सफॉर्म' विषयावर आधारीत या हॅकेथॉनमध्ये संपूर्ण भारतातील स्टार्ट अप्स, फिनटेक्स, डेव्हलपर्स आणि इन्नोव्हेटर्स कडून सहभागी होण्यास निमंत्रण देण्यात येत आहे. या उपक्रमाचे डिझाईन हे कलात्मकता वाढून तंत्रज्ञानातील कौशल्याचा वापर करुन बँकिंग क्षेत्राला भेडसावणाऱ्या जगातील प्रत्यक्ष सस्यांवर उपाय शोधण्यासाठी करण्यात आले आहे. याप्रसंगी बोलतांना आयडीबीआय बँकेचे एमडी आणि सीईओ श्री राकेश शर्मा यांनी सांगितले : " आयडीबीआय इन्नोव्हेट २०२६' च्या माध्यमातून, बँकिंग सेवांचे स्वरूप नव्याने घडवण्यासाठी प्रगल्भ बुद्धिमत्ता आणि नाविन्यपूर्ण कल्पनांचा संगम घडवून आणणारे प्रभावी उपाय विकसित करण्याचे आमचे उद्दिष्ट आहे. ही हॅकेथॉन डिजिटल क्षेत्रातील उत्कृष्टतेप्रती आणि ग्राहकाभिमुख नाविन्यपूर्णतेप्रती असलेली आमची वचनबध्दता अधोरेखित करते."

# लाडकी बहीण स्वावलंबी झाली पाहिजे

- खा. नीलेश लंके यांची रोजगारनिर्मितीची घोषणा
- ३७८ असंघटित बांधकाम कामगारांना ११ हजार रुपयांच्या किटचे वितरण

पारनेर : (स. गांवकरी)



राज्य शासनाच्या लाडकी बहीण योजनेमुळे महिलांना आर्थिक मदत मिळत असली तरी त्यांनी केवळ अनुदानावर अवलंबून न राहता स्वतःच्या पायावर उभे राहिले पाहिजे. आमची लाडकी बहीण कोणावरही अवलंबून राहणारी नसून ती स्वतः कुटुंबाचा आधार बनली पाहिजे. त्यासाठी मतदारसंघात विविध स्वयंरोजगार व उद्योगाधारित योजना राबविण्यात येणार असून महिलांना दरमहा २५ ते ३० हजार रुपये उत्पन्न मिळवून देणाऱ्या प्रकल्पांची अंमलबजावणी केली जाईल, अशी घोषणा खासदार डॉ. नीलेश लंके यांनी केली. असंघटित बांधकाम कामगारांसाठी शासनाच्या योजनेअंतर्गत ३७८ लाभार्थ्यांना भांडी व इतर जीवनावश्यक साहित्य असलेल्या सुमारे ११ हजार रुपये किमतीच्या किटचे वितरण गुरुवारी खासदार लंके यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना आरोग्यविषयक सुविधा तसेच आरोग्य कार्डचाही लाभ उपलब्ध करून दिला जाणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

महिलांना घरबसल्या रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी विशेष प्रकल्प राबविण्यात येणार असून महिलांनी तयार केलेल्या उत्पादनांच्या विक्रीची जबाबदारीही प्रतिष्ठान व संबंधित यंत्रणांकडून घेतली जाईल, असे खा. लंके यांनी स्पष्ट केले. उत्पादन तयार करणे महत्त्वाचे असले तरी त्याला बाजारपेठ उपलब्ध करून देणे अधिक आवश्यक असल्याने महिलांच्या उत्पादनांना योग्य बाजारपेठ मिळवून देण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था उभारण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

शासनाच्या विविध कल्याणकारी योजना प्रत्यक्ष गरजूंपर्यंत पोहोचल्या पाहिजेत, यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू असल्याचे सांगताना समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकासाचा लाभ पोहोचविणे हे लोकप्रतिनिधी म्हणून आपले कर्तव्य असल्याचे खा. लंके यांनी नमूद केले.

आपल्या भाषणात त्यांनी या योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी परिश्रम घेणाऱ्या कार्यकर्त्यांचे विशेष कौतुक केले. रूईछत्रपतीच्या माजी सरपंच अर्चना साबळे, शितल पोटे, रेश्मा मन्यार, सोनम पठारे आणि चंदू खेमनर यांनी असंघटित बांधकाम कामगारांना या योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी मोठी मेहनत घेतल्याचे त्यांनी सांगितले. शासनाच्या योजना अस्तित्वात असल्या तरी माहितीअभावी किंवा प्रशासकीय अडचणींमुळे त्या अनेकदा गरजूंपर्यंत पोहोचत नाहीत. अशा परिस्थितीत पात्र लाभार्थी शोधून त्यांना प्रत्यक्ष लाभ मिळवून देणे हे मोठे सामाजिक कार्य असल्याचे त्यांनी नमूद केले.

वितरित करण्यात आलेल्या साहित्य किटची किंमत सुमारे ११ हजार रुपये असल्याचे सांगताना खा. लंके यांनी लाभार्थ्यांना आरोग्य कार्डची सुविधाही उपलब्ध होणार असल्याचे स्पष्ट केले. आतापर्यंत अनेक लाभार्थ्यांनी आरोग्यविषयक सुविधांचा लाभ घेतला असून भविष्यात आणखी मोठ्या संख्येने कामगार या योजनेशी जोडले जातील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. सामाजिक बांधिलकी जपत काम करणे हीच आपली कार्यपद्धती असल्याचे सांगताना खा. लंके म्हणाले की, ज्या-ज्या ठिकाणी नागरिकांना अडचणी निर्माण होतात तेथे मदतीचा हात देण्यासाठी नीलेश लंके प्रतिष्ठानचे सहकारी तत्पर असतात. समाजातील दुर्बल, वंचित आणि गरजू घटकांना आधार देणे ही आमची जबाबदारी आहे. यावेळी त्यांनी दिव्यांग संघटनेचे सुनील करंजुले यांच्या कार्याचाही विशेष गौरव केला. दिव्यांगांसाठी त्यांनी केलेले कार्य प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले.

## व्हाईट मिसचीफ व्होडकाच्या नव्या आणि प्रीमियम अवताराचे अनावरण

नवी दिल्ली : (स. गांवकरी)

भारतातील सर्वाधिक लोकप्रिय व्होडका ब्रँड्सपैकी एक असलेल्या व्हाईट मिसचीफ व्होडकाने आपल्या मुख्य पोर्टफोलिओमध्ये व्यापक ब्रँड रिवॅम्प आणि प्रीमियमायझेशनची घोषणा केली आहे. हा बदल ब्रँडच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा असून, अधिक दर्जेदार पण सहज आणि आनंददायी ड्रिंकिंग अनुभव शोधणाऱ्या नव्या पिढीच्या ग्राहकांसाठी ब्रँडची नव्याने मांडणी करण्यात आली आहे. या नव्या पोर्टफोलिओमध्ये आकर्षक आणि आधुनिक पॅकेजिंग डिझाइन, अधिक प्रभावी व्हिज्युअल ओळख आणि अधिक स्मूथ व आधुनिक व्होडका अनुभव देण्यासाठी विकसित केलेले सुधारित लिक्विड प्रोफाइल समाविष्ट आहे. ब्रँडची युवा आणि उत्साही ओळख कायम ठेवत, नव्या व्हाईट मिसचीफ व्होडकाला अधिक प्रीमियम आणि आधुनिक रूप देण्यात आले आहे, जे बदलत्या ग्राहकांच्या पसंतीशी सुसंगत आहे.




या बदलाबद्दल बोलताना इनब्रू बेव्हरेजेसचे जनरल मॅनेजर- मार्केटिंग, श्री. सुमित तिवारी म्हणाले, "ही प्रीमियमायझेशन मोहीम आमच्या व्यापक धोरणाचा एक भाग आहे. यामागील उद्दिष्ट म्हणजे आमचा पोर्टफोलिओ अधिक मजबूत करणे आणि भारतातील युवा प्रौढ ग्राहकांमध्ये आधुनिक व उच्च दर्जाच्या व्होडकासाठी वाढणारी मागणी पूर्ण करणे. व्हाईट मिसचीफला भारतीय व्होडका बाजारात नेहमीच मजबूत ग्राहक ओळख आणि सांस्कृतिक महत्त्व लाभले आहे.

## सार्वजनिक बांधकाम विभागाचा अजब कारभार

- सिन्नर तालुक्यातील १५ कोटींच्या १३ कामांची एकच निविदा

नाशिक : (स. गांवकरी)



सार्वजनिक बांधकाम विभागाकडे कंत्राटदारांची हजारो कोटींची बिले थकल्याने कंत्राटदार अडचणीत सापडलेले असतानाच, विभागाने आता नवीन विकासकामांमध्ये क्लबिंग (कामे एकत्र करणे) करून स्थानिक व लहान कंत्राटदारांची कोंडी केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. सिन्नर तालुक्यातील १३ वेगवेगळ्या गावांमधील रस्ते दुरुस्ती व नवीन रस्त्यांची सुमारे १५ कोटींची कामे एकत्र करून त्याची एकच संयुक्त निविदा प्रसिध्द करण्यात आल्याने कंत्राटदारांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. या अजब कारभाराविरोधात महाराष्ट्र इंजिनिअर्स असोसिएशन सुशिक्षित बेरोजगार अभियंता संघटनेने मुख्य अभियंत्यांना पत्र देत या प्रक्रियेवर आक्षेप नोंदविला आहे.

जिल्हा नियोजन समितीने अल्पसंख्याक योजनेंतर्गत सिन्नर तालुक्यातील विविध गावांना जोडणाऱ्या रस्त्यांसाठी १४ कोटी ९८ लाख ५७ हजार रुपयांच्या एकूण १३ कामांना मंजुरी दिली होती. सार्वजनिक बांधकाम विभागाने ३१ डिसेंबर २०२५ रोजी या सर्व कामांची स्वतंत्र प्रशासकीय मान्यताही देण्यात आली होती. यात, कोळगाव माळ : गुलाब पटेल ते करीम पटेल वस्ती रस्ता सुधारणे, निसार पठाण ते अब्दुल पटेल वस्ती रस्ता सुधारणे, पटेल वस्ती ते हुसेन सय्यद वस्ती रस्ता सुधारणे, आणि गुलाब शेख ते इब्राहिम शेख वस्ती रस्ता सुधारणे, चास, डुबेरे, देवपूर, नायगाव, पांढुर्ली, वडांगळी, वावी, शहा आणि ठाणगाव या गावांमधील अल्पसंख्याक वस्त्यांमधील रस्ते सुधारणेची कामे आदींचा समावेश आहे. शासन नियमानुसार, प्रत्येक रस्त्याची किंवा कामाची स्वतंत्र निविदा प्रसिद्ध होणे अपेक्षित होते. मात्र, कार्यकारी अभियंत्यांनी ही सर्व १३ कामे एकत्र करून एकच महा-निविदा काढली. वेगवेगळ्या गावांमध्ये मैलोन्मैल विखुरलेल्या या रस्त्यांची कामे एकत्रित करण्यामागे नेमका काय हेतू आहे? असा सवाल आता उपस्थित होत आहे. मोठ्या कंत्राटदारांना फायदा पोहोचवण्यासाठी आणि स्थानिक, लघु व सुशिक्षित बेरोजगार कंत्राटदारांना या प्रक्रियेतून जाणीवपूर्वक बाहेर काढण्यासाठीच अशा जाचक अटी घालण्यात आल्या आहेत. सदर ठेका रद्द करण्यात यावा. सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार देण्याची मागणी छावा भारत क्रांती मिशन संघटनेने केला आहे.

## खालिंगच्या मैदानावर ५० देशी वृक्षांची लागवड

- साने गुरुजी सेवाभावी संघटनेच्या वृक्षसंवर्धन वारीला २० वर्षे पूर्ण

भिवंडी : (स. गांवकरी)



जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधत साने गुरुजी सेवाभावी संघटनेच्या वतीने खालिंग गावातील खेळाच्या मैदानाच्या पश्चिम बाजूस 50 देशी वृक्षांची लागवड करून पर्यावरण संवर्धनाचा प्रेरणादायी उपक्रम राबविण्यात आला. यामध्ये वड, पिंपळ, बेलपत्र, कदंब, मोह यांसारख्या पर्यावरणपूरक व जैवविविधतेस पोषक असलेल्या वृक्षांच्या रोपांचा समावेश होता.

आमने-लोणाड परिसरात वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून सुरू करण्यात आलेल्या 'वृक्षदिंडी सोहळ्या'च्या रूपाने साने गुरुजी सेवाभावी संघटना गेली दोन दशके वृक्षसंवर्धनाची वारी सातत्याने पुढे नेत आहे. यंदा या उपक्रमाला 20 वर्षे पूर्ण होत असून, पर्यावरण संरक्षणासाठी संघटनेने उभारलेले कार्य परिसरासाठी आदर्शवत ठरले आहे. मागील 20 वर्षांत संघटनेने खारबाव येथील स्मशानभूमी, सांगे येथील सार्वजनिक मैदान तसेच इतर सार्वजनिक ठिकाणी मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करून त्यांचे जतन व संवर्धन केले आहे.

दरम्यान, शिक्षिका रेश्मा गणेश गायकवाड यांचा वाढदिवस 5 जून रोजी असल्याने त्यांनी पर्यावरण रक्षणाचा संदेश देत 50 वृक्षांची रोपे भेट स्वरूपात उपलब्ध करून दिली. वाढदिवसाच्या निमित्ताने वृक्षारोपणासारखा समाजोपयोगी उपक्रम राबवून त्यांनी पर्यावरण संवर्धनाची सामाजिक बांधिलकी जपली. त्यांच्या या उपक्रमाचे विविध स्तरांतून कौतुक होत असून, इतरांनीही अशा उपक्रमातून प्रेरणा घ्यावी, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली. या कार्यक्रमास ठाणे-पालघर प्राथमिक शिक्षक पतसंस्थेचे विद्यमान अध्यक्ष तथा साने गुरुजी सेवाभावी संघटनेचे सचिव प्रशांत घागस, संघाचे कार्याध्यक्ष संतोष जोशी, खालिंग गावचे सरपंच राजाराम शेलार, संदीप शेलार, महेश पितांबरे, शिक्षक गणेश गायकवाड, आप्पासो घोडके, शरद ठाणगे, खालिंग केंद्रप्रमुख मनोज पवार, संदीप मांजे, समाजसेवक नितीन पाटील, संघाचे संस्थापक अध्यक्ष प्रशांत भोसले, केतन पाटील, यतीश शेलार यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या समारोपावेळी उपस्थित सर्वांनी वृक्षांचे संगोपन व संवर्धन करण्याची सामूहिक शपथ घेतली. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षसंवर्धन ही काळाची गरज असल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले. वृक्षारोपणाबरोबरच त्यांचे संगोपन आणि संरक्षण करण्याची जबाबदारी प्रत्येक नागरिकाने स्वीकारली पाहिजे, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

## संजयची भूमिका माझ्यासाठी मोठा शिकण्याचा अनुभव

पुणे : (स. गांवकरी)



झी टीव्ही वाहिनी ही नेहमीच देशभरातील प्रेक्षकांच्या मनाला भिडणाऱ्या भावनिक आणि हृदयस्पर्शी कथा सादर करण्यासाठी ओळखली जाते. 'गंगा माई की बेटियाँ', 'वसुधा' आणि 'तुम से तुम तक' ह्या तीनही मालिका टीआरपी चार्टमध्ये टॉप 5 मध्ये स्थान मिळवत प्रेक्षकांची मने जिंकत आहेत. आता लवकरच 'तू ही रे दिल में' या नवीन मालिकेद्वारे प्रेक्षकांना पुन्हा एकदा आकर्षित करण्यासाठी वाहिनी सज्ज झाली आहे. 15 जूनपासून प्रसारित होणाऱ्या या मालिकेत अब्रार काझी (संजय), प्रियांशी यादव (वृंदा) आणि सिमरन रावल (स्वाती) मुख्य भूमिकांमध्ये दिसणार आहेत. प्रेमकथेबरोबरच 'तू ही रे दिल में' ही नियती, नाती आणि आयुष्य बदलणाऱ्या निर्णयांची भावनिक कहाणी आहे. ही कथा आहे वृंदा या तरुणीची, जिचा श्रद्धा आणि नियतीवर ठाम विश्वास आहे. मात्र परिस्थिती तिच्या आयुष्यात असा वळण आणते की तिच्या विश्वासासमोर मोठे आव्हान उभे राहते. वृंदा, संजय आणि स्वाती यांच्या आयुष्यांचा प्रवास एकमेकांशी गुंफला जातो आणि त्यातून प्रेम, त्याग, हृदयभंग आणि कठीण निर्णयांनी भरलेली, भावनिक खोली असलेली आणि प्रेक्षकांना जवळची वाटणारी प्रभावी कथा उलगडत जाते. अब्रार काझी या मालिकेत संजयची मुख्य भूमिका साकारताना दिसणार आहे. त्याने आपल्या व्यक्तिरेखेबद्दल आणि ही भूमिका त्याच्यासाठी खास का आहे याबद्दल मनमोकळेपणाने संवाद साधला.

## इंडियन कॅन्सर सोसायटीच्या 'उगम' उपक्रमाची १७ वर्षे पूर्ण

### बालपणीच्या कर्करोग विजेत्यांना नवे बळ

पुणे : (स. गांवकरी)




कर्करोग नियंत्रणासाठी कार्य करणारी भारतातील पहिली स्वयंसेवी आणि ना-नफा तत्त्वावरील संस्था इंडियन कॅन्सर सोसायटी (आयसीएस) यांच्या प्रमुख बालक कर्करोग सर्व्हायव्हरशिप उपक्रम 'उगम'च्या १७ व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात मुंबईतील ५२५ पेक्षा जास्त कर्करोग विजेते, त्यांचे कुटुंबीय, आरोग्यसेवा क्षेत्रातील तज्ज्ञ, समर्थक आणि हितचिंतक सहभागी झाले होते.

२००९ मध्ये स्थापन झालेल्या 'उगम'ची पायाभरणी एका साध्या पण प्रभावी विश्वासावर झाली होती. कर्करोगावर मात करणे हा प्रवासाचा शेवट नसून, नव्या संधी, स्वप्ने आणि उद्दिष्टांनी भरलेल्या आयुष्याची सुरुवात आहे. टाटा मेमोरियल रुग्णालयातील कर्करोग विजेत्यांच्या एका गटाने इंडियन कॅन्सर सोसायटीच्या स्वयंसेवी सहाय्य गटाच्या रूपाने या उपक्रमाची सुरुवात केली. 'उगम'च्या प्रेरणादायी प्रवासातून प्रेरणा घेत इंडियन कॅन्सर सोसायटीने देशभरात १९ ॲक्ट क्लिनिक्स सुर करण्यास मदत केली असून, त्यामध्ये ४,००० पेक्षा जास्त कर्करोग विजेत्यांची नोंदणी करण्यात आली आहे. 'प्रोजेक्ट पिकासो' या उपक्रमाच्या माध्यमातून उपचारानंतरच्या आयुष्यातही कर्करोग विजेत्यांना आवश्यक आधार आणि मार्गदर्शन दिले जात असल्याची माहिती इंडियन कॅन्सर सोसायटीच्या वैद्यकीय व्यवहार विभागाच्या उपमहासंचालक) डॉ. वंदना धामणकर यांनी दिली.

यंदाच्या वर्धापनदिन सोहळ्याची संकल्पना महाभारतातील संघर्ष, धैर्य, मैत्री आणि संकटांवर मात करून मिळविलेल्या विजयाच्या प्रेरणेतून साकारण्यात आली होती. 'संघर्ष से साहस तक' ही यंदाच्या कार्यक्रमाची मध्यवर्ती संकल्पना होती. संघर्षातून यशाकडे वाटचाल करणाऱ्या कर्करोग विजेत्यांचा प्रेरणादायी प्रवास या संकल्पनेतून अधोरेखित करण्यात आला. कार्यक्रमातील प्रत्येक घटकाने या संकल्पनेचा आशय प्रभावीपणे उलगडून दाखविला.

"या सोहळ्याला महाराष्ट्र राज्याचे कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्री श्री. मंगल प्रभात लोढा मुख्य अतिथी म्हणून उपस्थित होते. तर टाटा मेमोरियल सेंटरचे 'डीन – अकॅडमिक प्रोजेक्ट्स' आणि टाटा कॅन्सर केअर फाउंडेशनचे मुख्य सल्लागार डॉ. कैलाश शर्मा यांची विशेष अतिथी म्हणून उपस्थिती होती. याप्रवासा सोहळ्याला इंडियन कॅन्सर सोसायटीचे विश्वस्त, देणगीदार, समर्थकांसह वैद्यकीय क्षेत्रातील नामांकित कर्करोग तज्ज्ञ आणि मानसोपचार-कर्करोग तज्ज्ञ मोठ्या संख्येने उपस्थित होते."

याप्रसंगी बोलताना 'उगम'च्या निमंत्रक डॉ. पूर्णा ए. कुरकुरे म्हणाल्या, "भारतात दरवर्षी हजारो बालकांना कर्करोगाचे निदान होते. वैद्यकीय क्षेत्रातील प्रगतीमुळे आज कर्करोगातून बरे होणाऱ्या मुलांचे प्रमाण लक्षणीय वाढले आहे. मात्र, उपचार पूर्ण झाल्यानंतरचे त्यांचे आयुष्य पूर्वपदावर आणण्यासाठी तितकेच लक्ष देणे गरजेचे आहे. 'सर्व्हायव्हरशिप' (कर्करोगावर मात केल्यानंतरचे जीवन) म्हणजे या तरुण मुलांना निरोगी, उत्पादनक्षम आणि समृद्ध जीवन जगण्यास मदत करणे होय. 'उगम' हे एक असे व्यासपीठ बनले आहे, जिथे या मुलांना एकमेकांचा पाठिंबा, योग्य मार्गदर्शन, मैत्री आणि मोठी स्वप्ने पाहण्याचा आत्मविश्वास मिळतो. त्यांचे हे संघर्षमय प्रवास आपल्याला दाखवून देतात की, कर्करोग कोणत्याही मुलाचे भविष्य ठरवू शकत नाही."